**बिसेन डेन्टल केअर**

डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ

बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया

सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -११ गोंदिया | अंक २२ | बुधवार,दि.०४ मे एप्रिल २०२२ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


# पं.स.सभापती, जि.प.अध्यक्ष निवडणुकीत भाजप-राकाँ युती?



■ नागपूरच्या बैठकीत ठरणार भाजपचा उमेदवार,■ तिरोडा,सडक-अर्जुनी व सालेकसा तालुके अध्यक्ष पदापासून दूर



भारतीय जनता पक्षाच्या निवडणूक चिन्हावर २६ सदस्य निवडून आले आहेत. यापुर्वी भाजपने नेतराम कटरे व विजय शिवणकर यांच्या नेतृत्वात पाच वर्ष बहुमतात सत्ता स्थापन केली होती. आता परत भाजपला संधी मिळाली आहे. माजी पदाधिकारी जे निवडून आले त्यांनाही परत पदाधिकारी होण्याची इच्छा निर्माण झाली आहे. परंतु आजपर्यंतचा विचार केल्यास तिरोडा, सडक-अर्जुनी व सालेकसा या तालुक्यांना अध्यक्ष पदासाठी संधी मिळालेली नाही. त्यातच भाजपने सर्वाधिक जागा तिरोडा विधानसभा मतदार संघात जिंकल्याने अध्यक्ष पदावर या मतदार संघाचा प्रबळ दावा मानला जात आहे. भाजपकडे २६ सदस्यांमध्ये ८ पोवार,३ कुणबी,३ कोहळी,६ आदिवासी, ४ अनुसूचित जाती,१ लोधी व १ अन्य सदस्य निवडून आले आहे.

### अर्जुनी मोरगावसाठी त्या आमदाराचा आग्रह, इच्छुकांचा हिरमोड

जिल्हा परिषद अध्यक्ष आपल्या मजीतील असल्यास बरीच कामे तडीस नेण्यास मदत होते.त्यामुळे एका आमदाराने अध्यक्षपदी अर्जुनी मोरगाव तालुक्यातील जिल्हा परिषद सदस्याची वर्णी लावावी यासाठी आग्रह धरला आहे. या आमदाराची वरिष्ठ पातळीवरदेखील चांगली पकड आहे.त्यामुळे नेमकी कुणाची वणी लागते,याकडे आता सर्वांचे लक्ष लागले.

### भाजपचे सदस्य बोदलकशावरुन रवाना होणार

१० मे रोजी होवू घातलेल्या जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष निवडणुकीसाठी सदस्य सहलीवर निघाले आहेत. भाजपने पंचायत समिती स्तरावर नियुक्त केलेल्या नेत्यांना सदस्यांना जिल्ह्याच्या शेजारील पर्यटन स्थळावर घेवून जाण्याच्या सुचना दिल्या आहेत. तर दुसरीकडे जिल्हा परिषद सदस्यांना बुधवार ४ मे रोजी बोदलकसा येथे एकत्रीत करुन दुपारी ३ ते ४ वाजेच्या सुमारास सहलीसाठी रवाना करण्याची जवाबदारी पक्षाने आमदार विजय रहांगडाले यांच्याकडे सोपवल्याची माहिती हाती आली आहे.

### अपक्ष सदस्यांच्या मनात काय

जिल्हा परिषदेत सत्ता कुणाची याचे सर्व समीकरण हे अपक्ष सदस्यांवर अवलंबून आहे.हे सत्ता स्थापन करण्यासाठी या सदस्यांना पदाची ऑफर दिली जाण्याची शक्यता आहे; पण या अपक्ष सदस्यांचा कल नेमका कुणाच्या बाजूने आहे,त्यांची इच्छा नेमकी काय,हे मात्र त्यांनी अद्यापही बोलून दाखविलेले नाही.त्यामुळे त्यांच्या मनात नेमके काय दडलेय हे कळण्यास मार्ग नाही.

### पंचायत समितीत भाजप सरस

जिल्ह्यातील आठपैकी पाच पंचायत समितींवर भाजपची सत्ता स्थापन होण्याची शक्यता पक्षीय बलाबलावरून दिसून येते, तर सालेकसा पंचायत समितीत काँग्रेसला स्पष्ट बहुमत असल्याने येथे काँग्रेसची सत्ता स्थापन होईल;पण गोंदिया पंचायत समितीत सत्तेचे सर्व समीकरण चाबीच्या भूमिकेवर अवलंबून आहे.त्यामुळे पंचायत समितीचे अंतिम चित्र ५ मे रोजीच स्पष्ट होईल.



**गोंदिया:** गेल्या तीन महिन्यांपासून लांबलेली गोंदिया जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्षपदाची निवडणूक १० मे रोजी होणार आहे. मात्र जिल्हा परिषद अध्यक्षाच्या नावावर भारतीय जनता पक्षाच्या जिल्हा बैठकीत अद्यापही शिक्का मोर्तब करण्यात जिल्ह्यातील भाजप नेत्यांना यश न आल्याने आता नागपूर येथे ७ मे रोजी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत होणाऱ्या पार्लमेंटरी बोर्डाच्या बैठकीत निर्णय होणार आहे.

सुत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार गोंदिया पंचायत समितीच्या सभापती निवडणुकीत चाबी संघटनेला सोबत घेण्यास भाजपच्या काही नेत्यांचा विरोध आहे. तर चाबी संघटना मात्र गोंदिया पंचायत समितीत सभापती, उपसभापती पद दोन्ही दिल्यास जिल्हा परिषदेत भाजपला समर्थन देण्याचा विचार करत असल्याची चर्चा असतांनाच सत्तेपासून काँग्रेसला दूर ठेवण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेससोबत भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यात भाजप प्रयत्नशील असल्याची चर्चा आहे.

गोंदिया पंचायत समितीत भाजपच्या नेत्यांनी चाबी ऐवजी राष्ट्रवादीसोबत युतीचे संकेत दिले आहेत. यामुळे जि.प.अध्यक्ष पदाच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस तठस्थ किंवा गैरहजर रहाण्याची शक्यता वर्तविली जात आहे. तर चाबी संघटनेला मात्र भूमिका घेताना नितीन गडकरी यांच्याकडे भविष्यातील योजनांचा विचार करुनच निर्णय घ्यावा लागणार आहे.

जिल्ह्यातील राजकीय समीकरण पाहता काँग्रेस राष्ट्रवादी एकत्र येऊन अपक्ष सदस्यांच्या मदतीने सत्ता स्थापन करण्याची शक्यता कमी आहे. त्या दृष्टीने या दोन्ही पक्ष्यांच्या कुठल्याच हालचाली सुद्धा सुरू नाही.तर गोंदिया जिल्हा परिषदेतील आजवरचा इतिहास पाहता काँग्रेसने राष्ट्रवादीला बाजूलाच सारण्याचाच प्रयत्न केला आहे. त्यामुळे सत्ता स्थापनेसाठी हे दोन्ही पक्ष एकत्र येण्याची शक्यता कमीच आहे.त्यामुळेच सत्ता स्थापनेसाठी भाजपची स्थिती सध्या भक्कम आहे.त्यासाठी मागील आठवडा भरापासून भाजपच्या स्थानिक नेत्यांनी हालचाली सुद्धा सुरू केल्या आहेत.जिल्हा परिषदेत सत्ता स्थापन करण्यासाठी भाजप नेत्यांच्या आतापर्यंत दोन तीन बैठका सुद्धा पार पडल्या. मंगळवारी नागपूरात झालेल्या एका बैठकीत जिल्ह्यातील आजी-माजी आमदार व जिल्हाध्यक्षांनी वरिष्ठ नेत्यांशी अध्यक्षपदाच्या उमेदवारांबाबत चर्चा केली. परत अध्यक्षपदाच्या नावावर अंतिम शिक्का मोर्तब करण्यासाठी ७ मे रोजी नागपूर येथे बैठक बोलविली असून याच बैठकीत नावाचा निर्णय घेतला जाणार आहे. त्यासोबतच ९ मे रोजी सदस्यांना अधिकृत नाव कळविले जाणार असल्याची माहिती आहे.

जिल्हा परिषद अध्यक्षपदी कुणाची वणी लावायची हे जिल्ह्यातील भाजप नेत्यांनी जवळपास निश्चित केले आहे. पण नेमक्या कुठल्या नावांची चर्चा आहे.यावर जिल्ह्यातील भाजप नेत्यांनी अद्यापही काहीच सांगितले नसून सर्व निर्णय पार्लमेंटरी बोर्ड घेणार असल्याचे सांगितले.

## गडचिरोलीत पोलीस-नक्षलवाद्यांमध्ये चकमक; एक जवान जखमी



**गडचिरोली :** नक्षलग्रस्त आणि अतिसंवेदनशील भामरागड तालुक्यातील धोडराज पोलीस मदत केंद्र अंतर्गत येत असलेल्या जंगल परिसरात आज सकाळच्या सुमारास पोलीस आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक उडाल्याची घटना घडली आहे.

महाराष्ट्र पोलीसांच्या गडचिरोलीतील मसी-६०फ दलातील पोलीस जवानांचे नक्षल विरोधी अभियान राबवत सुरू होते. यावळी जंगलात दबा धरून बसलेल्या नक्षलवाद्यांनी पोलीस जवानांवर अचानक अंधाधुंद गोळीबार केला. या नक्षलवाद्यांच्या या गोळीबाराला पोलिसांनीही प्रत्युत्तर देत गोळीबार केला. यानंतर उडालेल्या चकमकीत एक पोलीस जवान जखमी झाला असून जवानाला हेलिकॉप्टरने उपचारासाठी नागपूर येथे रवाना करण्यात आले.

जखमी जवानाचे नाव राकेश उपाध्याय असून ऑरेंजसिटी रुग्णालयात या जवानाची गडचिरोली परिक्षेत्राचे उपमहानिरिक्षक संदिप पाटील यांनी रुग्णालयात जाऊन भेट घेत विचारपूस केली.

घटनास्थळावरुन नक्षलवाद्यांचे मोठ्या प्रमाणात साहित्य जप्त करण्यात पोलीस जवानांना यश आले आहे. घटनास्थळी अतिरिक्त पोलीस कुमक वाढवण्यात आली आहे. तसंच नक्षलवाद्यांविरोधात शोध मोहीम अधिक तीव्र करण्यात आली आहे.

भामरागड तालुका हा गडचिरोली जिल्ह्याच्या शेवटचा टोक असून छत्तीसगड सीमेवर वसलेला आहे. इंद्रावती नदीच्या पलीकडे छत्तीसगड राज्याचा भाग आहे. हा परिसर अतिसंवेदनशील असून सीमावर्ती भागात सी-६० पार्टीचे जवान नक्षल शोधमोहीम राबवत असताना ही चकमक उडाली आहे.

## देशाच्या विकासात महाराष्ट्राचे महत्वपूर्ण योगदान-पालकमंत्री प्राजक्त तनपुरे

**गोंदिया :** महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह अनेक समाजसुधारकांनी आपल्या आयुष्याचं समर्पण करुन समाजसुधारणा घडवून आणल्या. त्यांनी दाखविलेल्या मार्गानेच राज्याची वाटचाल सुरु आहे. महाराष्ट्राने गेल्या ६२ वर्षात सर्वच क्षेत्रात नेत्रदिपक कामगिरी करुन विविध क्षेत्रात देशात अव्वल स्थान पटकाविले असून देशाच्या विकासात महाराष्ट्राचे महत्वपूर्ण योगदान आहे असे गौरोदगार पालकमंत्री प्राजक्त तनपुरे यांनी काढले.

पोलीस मुख्यालयाच्या कारंजा येथील मैदानावर १ मे रोजी महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६२ व्या वर्धापन दिनानिमीत्त ध्वजारोहण केल्यानंतर उपस्थितांना संबोधीत करतांना श्री. तनपुरे बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी नयना गुंडे, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, पोलीस अधीक्षक विश्व पानसरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

खरीप पणन हंगाम २०२१-२२ अंतर्गत १ लाख २० हजार शेतकऱ्यांकडून ३५ लाख ५६ हजार क्विंटल धान खरेदी करण्यात आला. याची किंमत ६९० कोटी एवढी आहे. ६८४ कोटी रुपयांचे चुकारे अदा करण्यात आले आहेत. महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०१९ योजने अंतर्गत गोंदिया जिल्ह्यामध्ये आज अखेर एकूण २७ हजार ८७४ शेतकरी पात्र झालेले आहे. त्यापैकी २७ हजार ४०६ शेतकऱ्यांना ११० कोटी रुपयांचा लाभ देण्यात आला आहे.

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेअंतर्गत ५२ वारसांना १ कोटी २ लाख रुपयांची मदत वाटप करण्यात आली आहे. महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंर्गत आतापर्यंत १३ हजार ९१३ लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात आला आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत गोंदिया जिल्ह्यात सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात १ एप्रिल २०२१ ते मार्च २०२२ पर्यंत एकूण रुपये १५ हजार ९३४.९७ लक्ष निधी खर्च झालेले असून त्यामधून ६४.३३ लक्ष मनुष्य दिवस निर्मिती झालेली आहे. या आर्थिक वर्षात २ लाख ३ हजार ४२८ कुटूंबांना रोजगार पुरविण्यात आलेला आहे.

कोविड-१९ संसर्गामुळे गोंदिया जिल्ह्यामध्ये दोन्ही पालक गमावलेले एकूण ११ बालके असून, सदर बालकांच्या नावे महिला व बाल कल्याण विकास विभागामाफ र्त एक रकमी ५ लाख रुपये मुदत ठेव जमा करण्यात आलेली आहे. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कडून ११ बालकांच्या ६ कुटूंबांना ५० हजार रुपये प्रमाणे अर्थसहाय्य लाभ देण्यात आलेला आहे.

शासन अनुसूचित जातीच्या लाभार्थींना विविध योजनेच्या माध्यमातून लाभ देत आहे, ज्याममध्ये शिष्यवृत्ती योजनेत ५३२७ विद्यार्थ्यांना लाभ मंजूर केला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेत २०२, वसतिगृहामध्ये ४५४ विद्यार्थ्यांना, निवासी शाळामध्ये २६८ विद्यार्थ्यांना लाभ देण्यात आला. रमाई घरकुल योजनेमध्ये २०७८, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेमध्ये १३५३, धनगर घरकुल १५ असे एकूण ३४४६ घरकुलाला समितीने मंजुरी प्रदान केली आहे.

मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजनेसह विद्युत वितरण कंपनीद्वारे अन्य योजनेत जिल्ह्यात लक्षणीय



काम झाले आहे. जिल्ह्याच्या पर्यटन विकासाचा त्यांनी आवर्जुन उल्लेख केला. मत्स्यबीज निर्मितीत जिल्ह्यात मोठे काम झाले आहे असे सांगून पालकमंत्री म्हणाले की, महाआवास योजना ग्रामीण मध्ये गोंदिया जिल्हा राज्यात प्रथम आला ही बाब जिल्ह्यासाठी गौरवाची आहे. यासोबतच शासनाच्या विविध योजनेत जिल्ह्यातील सर्व शासकीय यंत्रणांनी उत्तम काम केले असून यापुढेही सर्वसामान्य माणूस डोळ्यासमोर ठेवून जिल्ह्याच्या विकासासाठी शासन-प्रशासन कटिबध्द आहे असा विश्वास पालकमंत्र्यांनी व्यक्त केला.

प्रारंभी पालकमंत्री प्राजक्त तनपुरे यांनी ध्वजारोहण करुन परेडचे निरीक्षण केले. पुरुष व महिला पोलीस दल, पुरुष व महिला होमगार्ड पथक, पोलीस बँड पथक, पोलीस श्वान पथक, अग्नीशमन दल यांनी परेड संचलन केले.

कार्यक्रमास अपर जिल्हाधिकारी राजेश खवले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शितल पुंड, निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेल-पत्रे, उपजिल्हाधिकारी सुभाष चौधरी यांचेसह विविध विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन मंजुश्री देशपांडे यांनी केले. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींचा पालकमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## अखेर जुन्या उड्डाण पूलावरील वाहतूक बंद



### रेल्वेट्रॅक परिसरातील पुलाला पडले भगदाड

गोंदिया-बालाघाट मार्गावरील जुन्या उड्डाण पुलाच्या बांधकामाला आता ७० वर्षे पूर्ण झाली आहे.त्यामुळे हा पूल जीर्ण झाला आहे.या पुलाच्या रेल्वे ट्रॅक परिसरातील भागाला मोठे मोठे भगदाड पडले आहे. पुलाच्या खालची बाजू सुध्दा जीर्ण झाल्याने केव्हाही मोठी घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही .

### २०१४ मध्येच रेल्वेने दिला होता इशारा

गोंदिया -बालाघाट मार्गावरील जुना उड्डाण पूल वाहतुकी साठी धोकादायक असून या उड्डाण पुलावरुन वाहतूक सुरू ठेवणे धोकादायक असल्याचा इशारा रेल्वे विभागाने २०१४ मध्ये जिल्हा प्रशासनाला पत्र देवून दिला होता. मात्र तत्कालीन अधिकाऱ्यांनी गांर्भियाने दखल घेतली नव्हती.मुंबई येथे घडलेल्या घटनेनंतर रेल्वे विभाग कोणताही धोका पत्कारण्यास तयार नाही.त्यामुळेच पुन्हा २०१८ मध्ये तातडीने पत्र देवून जुन्या उड्डाण पुलावरील वाहतूक पूर्ण बंद करण्यास सांगितले,त्यास आज ४ वर्षाचा काळ लोटला असून जिल्हाप्रशासन फक्त उड्डाण पूलावरील वाहतूक बंद करण्याचे पत्र काढून काही दिवसांनी पून्हा लोकप्रतिनिधींच्या दबावात वाहतूक सुरु करण्याची परवानगीच देत असल्याचे बघावयास मिळाले आहे.

**गोंदिया:** शहरातील गोंदिया-बालाघाट मार्गावरील रेल्वे उड्डाण पूल जीर्ण झाल्याने वाहतुकीस धोकादायक असून तो केव्हाही कोसळण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे हा पूल वाहतुकी साठी पूर्णपणे बंद करुन पूल त्वरीत पाडण्यासंबधी जुर्ले २०१८ मध्ये रेल्वे विभागाने जिल्हा प्रशासनाला दिले होते. त्यानंतर ३१ जुर्लेपासून जडवाहतूक बंद करुन तो पूल लहान वाहनाच्या वाहतुकीकरीता सुरु ठेवण्यात आलेला होता. वास्तविक या ४ वर्षात पूल पाडून त्याठिकाणी नवीन पूल तयार व्हायला हवे होते. मात्र जिल्हा प्रशासन व स्थानिक आमदार खासदांच्या दुर्लक्षामुळे ते होऊ शकले नाही. आता जिल्हाधिकारी नयना गुंडे यांनी आत्ता २५ एप्रिल २०२२ रोजी झालेल्या सभेनंतर २ मे २०२२ पासून हा पूल पुर्णतः वाहतूकीकरीता बंद करण्याचे आदेश जारी केले आहेत.त्यामुळे या पूलावरून शहराच्या दुसरा भागाला जोडणारा मार्ग बंद होणार असल्याने मोठ्या पूलावर वाहतुकीची मोठी कोंडी होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

गेल्या दोन वर्षापासून सदर पूल पाडण्यासाठी बांधकाम विभाग प्रयत्न करीत आहे,मात्र अद्यापही पूल पाडू शकले नाही. पूल पाडण्यासाठी बांधकाम विभागाची निविदा मंजूर झाली परंतू कत्रांटदाराने अद्याप काम सुरु केलेले नाही. जोपर्यंत हा पूल पाडला जात नाही,तोपर्यत नविन पूलाच्या बांधकामालाही सुरवात होणार नाही. त्यातच पूलाखाली राहणार्या कुटूबियांनी आधी आमचे पूनर्वसन करा नंतरच पूल पाडा अशी भूमिका घेतल्याने जिल्हाप्रशासन गोंधळले गेले आहे.

गोंदिया बालाघाट मार्गावर १९५२ मध्ये उड्डाणपूल तयार करण्यात आला. या पुलामुळे रेल्वे ट्रॅकमुळे होणारी वाहतुकीची कोंडी टाळण्यास मदत झाली होती. तेव्हा पासून आत्ता पर्यंत म्हणजे जवळ ७० वर्षे याच उड्डाणपुला वरुन वाहतूक सुरु होती. याच उड्डाणपुला वरुन तिरोडा, बालाघाट मार्गे येणारी लहान मोठी सर्वच वाहने येतात. पलिकडच्या भागात जाण्यासाठी याच पुलाचा वापर केला जातो. दिवसभरात या पुलावरुन दोन ते तीन हजार वाहने धावतात.तर रेल्वे ट्रॅकच्या वरून जाणाऱ्या उड्डाण पुलाला ठिकठिकाणी मोठे खड्डे पडले आहे.

हा भाग रेल्वे विभागाच्या क्षेत्रात असल्याने रेल्वेने या उड्डाण पुलाचे स्ट्रक्चर ऑडिट केले. त्यात ट्रॅकवरुन गेलेला उड्डाण पूल वाहतूक करण्या योग्य नसून तो केव्हाही कोसळू शकतो. ही बाब आडिटनंतर पुढे आली. त्यामुळे रेल्वे विभागाने २१ जुलै २०१८ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाला पत्र देवून जुन्या उड्डाणपुलावरुन सुरु असलेली वाहतूक त्वरीत बंद करावी. या दरम्यान कुठली अनुचित घटना घडल्यास त्याला रेल्वे प्रशासन जबाबदार राहणार नाही असे म्हटले होते. सोबतच संभाव्य धोका लक्षात घेता हा उड्डाण पूल त्वरीत पाडण्यात यावा असे पत्रात म्हटले होते, त्यानंतरही या पूलावरून आजपर्यंत वाहतूक अद्यापही सुरूच आहे. जिल्हाधिकारी यांनी २ मे पासून पूर्णतःवाहतूकीसाठी पूल बंद करण्याचे निर्देश दिल्यानंतरही (दि.३मे) रोजी यापूलावरून वाहतूक सुरु होती.

विशेष म्हणजे २०१८ मध्येच सार्वजनिक बांधकाम विभाग, उपप्रादेशिक परिवहन विभाग आणि वाहतूक नियंत्रण विभागाच्या अधिकाऱ्यांच्या चमूने जुन्या आणि नवीन उड्डाण पुलाची पाहणी करुन अहवाल सादर केला होता. त्यात हा पूल पूर्णपणे जीर्ण झाला असून त्यावरुन वाहतूक सुरू ठेवणे धोकादायक असल्याचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांकडे २३ जुर्ले २०१८ रोजी सोपविला होता.

## वेळ पडल्यास विरोधात बसा-पटोले




**गोंदिया :** जिल्हा परिषद अध्यक्षपदाची निवडणूक १० मे रोजी होऊ घातली आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला आहे. याच अनुषंगाने काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सोमवारी (दि .२) जिल्ह्याचा दौरा करून जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांची बोदलकसा येथे बैठक घेऊन त्यांना कानमंत्र दिला. काहीही झाले तरी एकही सदस्य भाजपकडे जाऊ नये, वेळ पडल्यास विरोधात बसू; पण महाविकास आघाडीचा धर्म मोडायचा नाही , अशा स्पष्ट सूचना त्यांनी काँग्रेसच्या सदस्यांना केल्याची माहिती आहे.

राष्ट्रवादी आणि अपक्ष सदस्य एकत्रित आल्यास त्यांना सुद्धा सत्ता स्थापन करता येऊ शकते; पण मागील काही जिल्हा परिषद निवडणुकांचा अनुभव पाहता तसे होण्याची शक्यता कमी आहे. मात्र, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सोमवारी जिल्हा परिषद निवडणुकी बाबत स्पष्ट भूमिका जाहीर केली. सत्ता स्थापन करू तर महाविकास आघाडीसह, नाही तर विरोधात बसू, हाच फॉर्म्युला भंडारा जिल्हा परिषदेसाठी लागू राहील, हे देखील स्पष्ट केले. त्यामुळे भंडारा जि.प. वर महाविकास आघाडीची सत्ता येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

गोंदिया जिल्हा परिषदेतसुद्धा अपक्ष सदस्यांच्या मदतीने महाविकास आघाडीची सत्ता स्थापन व्हावी यासाठी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष दिलीप बन्सोड आणि इतर नेत्यांनी हालचाली सुरू केल्या आहेत. या संदर्भात त्यांनी राष्ट्वादीच्या नेत्यांसह चर्चा केल्याचे बोलले जाते. त्यामुळे यावरील निर्णयाचा चेंडू आता राष्ट्वादी काँग्रेसच्या कोर्टात गेला आहे.

## संपादकीय

# देशात बारा राज्यांवर विजेचे मोठे संकट

ऐन उन्हाळ्यात उष्णतेचा पारा अनेक राज्यांत पंचेचाळीसच्या पुढे गेला असून विजेची मागणी प्रचंड वाढल्यामुळे सर्व देशात लोडशेडिंगचे प्रमाण वाढले आहे. अपुऱ्या वीज पुरवठ्यामुळे महाराष्ट्रासह अनेक राज्यांना मोठा फटका बसला आहे. वारंवार वीज खंडित होत असल्याने जनतेत संताप व्यक्त होतो आहे आणि बिगर भाजप शासित राज्ये पुन्हा एकदा केंद्राकडे बोट दाखवून आपली जबाबदारीतून सुटका करू पाहत आहेत. भीषण उन्हाळा, वाढलेले तापमान, गरम वारे याला तोंड देताना लोकांना नाकीनऊ येत आहेत. त्यातच वारंवार वीज खंडित होत असल्याने पंखे, फ्रीज, एअर कंडिशन्ड, लिफ्ट, कॉम्प्युटर बंद पडत आहेत. त्याने लोक हैराण होत आहेत. देशातील बारा राज्यांत विजेची मागणी प्रचंड वाढली आहे. वाढत्या विजेच्या मागणीचे आज-वरचे सारे उच्चांक या वर्षी मोडले गेले आहेत. देशातील विजेची मागणी सतत वाढत असल्याने ती पुरी कशी करायची हे केंद्र सरकारपुढे मोठे आव्हान आहे. देशात दोन लाख सात हजारांपेक्षा जास्त मेगावॅटची मागणी यंदा नोंदवली गेली, हा आजवरचा सर्वात मोठा उच्चांक आहे. देशातील औष्णिक वीजनिर्मिती प्रकल्प जवळपास अडीच कोटी टन कोळसा आहे. दहा दिवस पुरेल एवढा त्याचा साठा आहे. पूर्ण क्षमतेने वीज उत्पादन होईल, यावर भर दिला पाहिजे, असे केंद्रीय कोळसा व खाणमंत्री प्रल्हाद जोशी यांनी म्हटले आहे. वीज निर्मितीसाठी प्रकल्पांना रोज दोन लाख वीस हजार टन कोळसा पुरवला जाईल, असे सीसीएलचे व्यवस्थापकीय संचालक पीएम प्रसाद यांनी म्हटले आहे.

रशिया-युक्रेन युद्धामुळे कोळसा आयातीवर गंभीर परिणाम झाला हे वास्तव आहे. पण दिल्ली, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र आदी राज्यांत तापमान एवढे वाढले की, विजेची मागणीही येथे वेगाने वाढली. झारखंड, हरयाणा, बिहार, पंजाब, राजस्थान, दिल्ली, महाराष्ट्र या राज्यांत विजेचे संकट मोठे आहे. तेथे विजेची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढली असून राज्य सरकारला लोडशेडिंगचाच आधार घ्यावा लागतो आहे. थर्मल पॉवर प्लांटकडे २१.५ दशलक्ष टन कोळशाचा साठा आहे, त्यामुळे घाबरण्याचे काहीही कारण नाही, असे कोळसा मंत्री सांगत आहेत. मग देशभर लोडशेडिंग का होते आहे, वीज पुरवठा वारंवार का खंडित होतो आहे, अर्थात याचा दोष केवळ केंद्र सरकार किंवा कोळसा मंत्र्यांना देऊन चालणार नाही. राज्यांचे नियोजन योग्य नसेल आणि कोळसा विकत घेण्यासाठी वेळेवर रक्कम दिली गेली नसेल, तर त्याचा नियमित पुरवठा तरी कसा होणार? केंद्राकडे बोट दाखविणे सोपे आहे. पण कोळसा खरेदीची कोणतीही थकबाकी राज्यांकडे नाही, असे राज्यांचे ऊर्जामंत्री ठामपणे सांगू शकतात का? देशात जेवढा कोळसा उत्पादन होतो तरीही किती तरी मोठ्या प्रमाणावर भारताला कोळशा आयात करावा लागतो. भारताला जवळपास २०० दशलक्ष टन कोळसा आयात करावा लागतो. इंडोनेशिया, चीन, ऑस्ट्रलिया आदी देशांतून कोळसा खरेदी करावा लागतो. ऑक्टोबर २०२१ पासून आयातीचे प्रमाण कमी होऊ लागले. पण आता मात्र आयातीवर पुन्हा जोर द्यावा लागतो आहे. कोल इंडियावर सारा देश अवलंबून आहे. वीज निर्मितीसाठी रोज १६.४ लाख टन कोळसा पुरवला जातो, हे कोल इंडियाने मान्य केले आहे. पण आता हीच मागणी २२ लाख टनावर पोहोचली आहे. कोळसा पुरवठा करण्यासाठी रेल्वेकडे पुरेशा वाघिणी नाहीत. ऊर्जा खाते, कोळसा मंत्रालय व रेल्वे मंत्रालय यांच्यात त्यासाठी समन्वय असणे जरुरीचे आहे.

महाराष्ट्रात तीन हजार मेगावॅट विजेचा तुटवडा आहे. राज्यात ग्रामीण भागात सर्वत्र लोडशेडिंगला सामोरे जावे लागत आहे. शहरांमधेही दोन दोन तास वीज खंडित होत आहे. उत्तर प्रदेशात ग्रामीण भागात केवळ चार ते सहा तास वीज पुरवठा होत आहे. राजस्थानात विजेच्या मागणीत ३१ टक्के वाढ झाली. सर्वत्र पाच ते सात तास वीज पुरवठा खंडित होत आहे. ग्रामीण भागात वीज खंडित होण्याचे प्रमाण जास्त आहे. पंजाबमध्ये मागणी आठ हजार मेगावॅटवर पोहोचली आहे. पंजाबात रोज चार ते आठ तासांपेक्षा जास्त लोडशेडिंग चालू आहे.

विजेच्या टंचाईवरून दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, बिहारचे ऊर्जामंत्री बिजेंद्र प्रसाद यादव, राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत, उत्तर प्रदेशचे ऊर्जामंत्री ए.के.शर्मा यांनी चिंता व्यक्त केली आहे. वाढत्या तापमानामुळे विजेची मागणी वाढली आहे, अशा परिस्थितीत विजेचा वापर संभाळून केला पाहिजे, असेही उत्तर प्रदेशच्या ऊर्जा मंत्र्यांनी म्हटले आहे. ऊर्जानिर्मिती प्रकल्पावर कोळसा वेळेवर पोहोचावा म्हणून देशभरातील सातशेहून अधिक प्रवासी रेल्वे गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. कोळसा वाहून नेणाऱ्या मालगाड्यांना महत्त्व दिले जात आहे.

# बहुजनांच्या मस्तकातला कर्मकांडांचा नरक कधी संपणार?

गेल्या काही दिवसात लग्न ठरवण्याच्या कामात सहभागी व्हायची संधी मिळाली. मित्रांच्या आणि पै-पाहूण्याच्या लग्न ठरवण्याच्या कार्यक्रमाला उपस्थित राहता आले. या निमित्ताने एक भयानक वास्तव डोळ्यासमोर आले. शिकली-सवरलेली माणसंही अजून पारंपारिक गुलामगिरीतून बाहेर पडल्याचे दिसले नाही. लग्न आणि त्या सोबत येणाऱ्या अंधश्रध्दांचा अतिरेक या निमित्ताने पहायला मिळाला. हे सगळं वास्तव अस्वस्थ करणारं आहे. बहुजन समाज आजही भटशाहीचा पक्का गुलाम आहे. त्याच्या डोक्यातली भटशाही आणि भटजी २१ व्या शतकातही निघालेली नाही. हे विदारक वास्तव या निमित्ताने समोर आले. मुळातच लग्न ठरवताना मुलगा-मुलगी पहायच्या आधी त्यांची पत्रिका पाहण्यापासून सुरूवात होते. मुलगा मुलीला पाहत नाही, मुलगी मुलाला पाहत नाही. पहिल्या पत्रिका पाहिल्या जातात. पत्रिका जुडली, भटजीने हिरवा कंदील दाखवला की मग ही मंडळी स्थळ पहायला जातात. पत्रिका नाही जुल्या तर न पाहताच मुलाला किंवा मुलीला नाकारले जाते. मुलीला मंगल आहे, मुलगा जेठा आहे वगैरे वगैरे सतरा भानगडी असतात मग यासाठी भटजीकडे उपाय योजनाही असतात.

भटजीने सांगितलेला उपाय केला की मग अडचण येत नाही. सगळं सुरळीत होतं. खेदाची बाब ही की, सुशिक्षीत मंडळी याला फार बडी पडतेय. नाकातला शेंबूड काढता न येणारा भटजी मंग? कसा शांत करणार ? ज्याला स्वतःचे पोट भरायची भ्रांत तो माणसावर आलेले बालंट कसे शांत करणार ? भटजी आणि त्याच्या मंत्रात इतकी ताकद आहे तर सीमेवर लष्कर का तैनात करावं लागतय? लष्करी खर्चासाठी हजारो करोड का खर्च करावे लागतायत? भटजीला सगळे कळत असेल, त्याच्याकडे त्यावर उपाय असेल तर भटजीलाच सीमेवर पंचांग, खारका, खोबरं, पान-सुपारी व तांदूळ देवून तैनात करायला काय हरकत आहे? रोज जवानांचे बळी का द्यायचे? भटजी करेल ना सगळ शांत? पृथ्वीपासून लाखो कि.मी. दुर असलेला मंगळ, ज्याला शांत करता येतो, तो पाकीस्तानला करेल की शांत? बहूजनांच्या मस्तकातला हा नरक कधी संपणार आहे का?

सुशिक्षीत लोकसुध्दा या व्यवस्थेचेच बळी आहेत याची जाणीव होते. त्यांनी घेतलेल्या शिक्षणाचे काय? ते काय शिकले? शिकून त्यांच्या डोक्यात काय आले? त्यांची विवेकबुध्दी, तर्कबुध्दी शिक्षणाने जीवंत का झाली नाही? असे अनेक प्रश्न पडतात. या लग्न व्यवहारात महिलावर्ग जास्त सक्रीय असतो. पुरुष बाहेर कोणीही असला तरी घरात त्याचा टाप चालत नाही. खरे तर मुळातच बहूजनांची कुटूंब पध्दती स्त्रीसत्ताक आहे. एकेकाळी त्यांची समाजव्यवस्था ही स्त्री सत्ताकच होती. कालांतराने ती पुरुष प्रधान झाली. आज समाजव्यवस्था पुरुष प्रधान असली तरी घरच्या अनेक व्यवहारात स्त्रीच प्रधान आहे किंवा स्त्रीसत्ताक व्यवस्थाच घरा-घरात आहे. माझा या व्यवस्थेला अजिबात आक्षेप नाही. स्त्री सत्ताक व्यवस्थेमुळे घराला घरपण राहते, कुटूंब चांगले चालते पण अडचणीची गोष्ट ही आहे की, बहूजनांच्या बहूतेक महिला या रूढी-परंपरेच्या जोखडातून, अंधश्रध्देतून बाहेर आलेल्या नाहीत. त्यांच्या डोक्यात भटशाहीचा नरक ठाण मांडून बसलाय. त्या अनेक बुवा-बाबांच्या गुलाम झालेल्या आहेत. त्यांच्या आयुष्यात त्यांना स्वतःला, नवरा-मुले यांना जितके महत्वाचे स्थान नाही, तेवढे त्या बुवा-बाबांना असते त्यामुळे प्रत्येक घरात भटशाहीची अनागोंदी सुरू आहे.

एखाद्या पुरुषाने एखादी परंपरा नाकारायचे ठरवले तर त्याची बायको लगेच दबाव (प्रेशर) टाकते. तुम्हाला काय कळतं का नाही? परत काय झाले तर कुणाला विचारायचे? जावू द्या गेले तर गेले पैसे ! असे म्हणत नवऱ्याला भटजीचा बकरा बनवते. भटजीने सांगितलेली कर्मकांडे करायला लावते. पुरूष मंडळींचे घरच्या प्रधानासमोर काही चालत नाही मग तो बाहेर कितीही बाजीराव असला तरी घायाळ होतोच.

मराठीत एक म्हण आहे, "गावाला भारी अन बायकोच्या आहारी!" खरेतर आहारी असायलाही हरकत किंवा आक्षेप नाही पण काही ठिकाणी स्वतःची विवेकबुध्दी, तर्कबुध्दी वापरायला पाहिजे. योग्य-अयोग्य याचा विचार करायला पाहिजे. जे योग्य आहे ते ऐकलेच पाहिजे. बायका सांगतायत म्हणून काहीही करणे जसे मुर्खपणाचे आहे तसेच पुरुषी अहंगडात बायका सांगतात म्हणून योग्य गोष्टी नाकारणे सुध्दा मुर्खपणाचे आहे.

अजून किती पिढ्या आपण हे भटजीचे गबाळ वागवायचे? अजून किती काळ भितीपोटी ही निरर्थक कर्मकांडं करत भटजींची रोजगार हमी योजना चालवायची? मुलाला किंवा मुलीला मंगळ असल्यास शांती करा, कालसर्प करा, नारायण नागबळी करा वगैरे वगैरे अनेक भानगडी आहेत. त्याच्या बिदाग्याही तेवढ्याच वजनदार आहेत. बैठकीला बसायलाही मुहूर्त पाहूनच सुरुवात होते. सुपारी फोडणे, मेड रोवणे, हळद दळणे, साखरपुडा करणे, याद्या करणे, अन शेवटी लग्न लावणे या सगळ्या गोष्टी भटजीशिवाय पुर्ण होत नाहीत. भटजी या लोकाना आमच्याकडे या म्हणून बोलवायला जात नाहीत पण बहूजनांनाही ते केल्याशिवाय मानसिकदृष्ट्या बिलकुल बरं वाटत नाही. भटजी बडबडला नाहीतर या लोकांना विधी झाल्यासारखे वाटत नाही. पोट साफ नाही झाल्यावर जसे अस्वस्थ होतात तसे हे लोक भटशाहीची रोजगार हमी योजना चालवणारी कर्मकांडे केली नाहीतर अस्वस्थ होतात.

अलिकडे खानापुर-आटपाडी या भागात लग्नासाठी खास, स्पेशल भटजींना आमंत्रीत करतात. या भटजींची बिदागी लाखाच्या घरात असते. भटजीने मंत्राच्या नावाखाली शिव्या दिल्या तरी या लोकांना बरं वाटतं, ते काय म्हणतंय किंवा म्हणालंय हे काही कळत नाही. पण ते बडबडल्याशिवाय बहूजनांना समारंभ झाल्यासारखे वाटत नाही. बहूजनांच्या या मानसिक गुलामगिरीत करोडो रुपयांचा धंदा दडलाय. या भितीवर भटजींचा धंदा जोरात चालतो. पत्रिकेतला मंगळ सांगून त्यांची स्वतःची चंगळ मात्र जोरात चालू असते.

एका तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी असलेल्या माझ्या एका मित्राच्या घरी शांती घालणारे भटजी भाड्याने रहात होते. सुमारे चौदा-पंधरा वर्षे ते त्याच्या घरी रहायला होते. या काळात त्यांनी अनेकांच्या शांत्या केल्या. कुणाचा नारायण नागबळी केला, कुणाचा कालसर्प केला. कुणाचा मंगळ केला, कुणाच्या लग्न जमण्यासाठीचा विधी केला. अनेक शांत्या, विधी ते करायचे. मला मित्राने सांगितलेली विशेष बाब ही की, ते या विधी करताना अंघोळही करायचे नाहीत. पाटावरच्या खारका-सुपा-या नेहमी त्याच त्या असायच्या. प्रत्येक विधीला त्याच सुपा-या, त्याच खारका वापरत असत म्हणे. महत्वाची बाब अशी की, इतरांची लग्ने व्हावीत म्हणून विधी करणारे, शांती घालणा-या भटजीबुवाचे स्वतःचेच लग्न झाले नव्हते. त्यांचे स्वतःचेच जुळत नव्हते पण ते इतरांचे लग्न व्हावे म्हणून भरभक्कम बिदागी घेवून विधी करत होते. मित्राने सांगितलेल्या माहितीनुसार त्याने एका वर्षात दोन महागड्या चार चाकी गाड्या खरेदी केल्या होत्या. खरेतर भटजी मंडळी स्वतःहून लोकांच्या दारात जात नाहीत. त्यांना बोलवत नाहीत पण सापळ्यात आला की धुतलाच. मोकळा सोडत नाहीत बहुजनाला. अजून किती पिढ्या बहूजन समाज या मानसिक गुलामगिरीत सडणार आहे? त्याची तर्कबुध्दी, त्याची विवेकबुध्दी कधी जागी होणार आहे का? असा अस्वस्थ करणारा प्रश्न सतत मनाला भेडसावत राहतो.

या निमित्ताने छत्रपती शिवरायांची आठवण आल्याशिवाय राहत नाही. राजांनी बहूतेक मोहिमा अमावस्येच्या रात्री काढल्या व त्या यशस्वी केल्या. ते लढाईसाठी मुहूर्त पहात बसले नाहीत. पेशवे मुहूर्त पाहूनच पानिपत लढायला गेले आणि हरले हा इतिहास आहे. छत्रपती राजाराम महाराज जन्माला येताना पालथे जन्माला आले तेव्हा भटजींनी गलका सुरू केला की, मुल पालथे जन्मले, हा अपशकून आहे. तेव्हा शिवाजीराजे म्हणाले, "हा अपशकून नाही तर शुभ शकून आहे. मुलगा पालथा जन्माला आलाय याचा अर्थ तो पाची पातशाह्यांना पालथं घालेल!" शिवरायांची ही तर्कबुध्दी, विवेकबुध्दी त्यांना डोक्यावर घेणा-या बहूजनांच्यात येणार का? हा खरा प्रश्न आहे. याच ठिकाणी आणखी एक उदाहरण देता येईल. ज्यावेळी स्वराज्यावर अफझल खान चालून आला तेव्हा तो जिंकावा म्हणून काही भटजींनी कोटीचंडी यज्ञ घातला. त्याच्या विजयासाठी यज्ञविधी केला पण शिवरायांनी त्याचा कोथळा काढलाच. अफझलखानाची प्रतापगडावर कबर खोदली. त्याच्या विजयाची हमी घेवून कोटीचंडी विधी करणारे भटजी आणि आजही बहूजनांच्या शांतीची विधी करणारे भटजी याच रोजगार हमी योजनेवर चरत आहेत.

हा फसवणूकीचा धंदा जोमाने चालवत आहेत. बहूजन समाज लवकर या सापळ्यातून बाहेर पडावा. हिच अपेक्षा...

**ॲड.बाळासाहेब खोपडे, पुणे**

# जोतिरावांनी शिवसमाधी शोधली, सुशोभिकरण केलं आणि शिवजयंती उत्सवही सुरू केला : हरी नरके

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी औरंगाबाद येथील सभेत बोलताना लोकमान टिळकांनी शिवाजी महाराजांची समाधी बांधली, असं वक्तव्य केलं होतं.

प्रा. नरके यांनी लिहिलेल्या एका लेखामध्ये याबाबत माहिती दिली आहे. शिवजयंती सुरू करण्याचे श्रेय सामान्यपणे लोकमान्य टिळक (Lokmanya Tilak) यांना दिलं जातं. १८९५-९६ साली लोकमान्य टिळक शिवजयंती उत्सवाच्या कार्यक्रमाला रायगडावर उपस्थित राहिले आणि त्यांनी या कार्यक्रमात सहभाग दिला. ही महत्त्वाची ऐतिहासिक घटना असल्याचे सांगत नरके म्हणाले, त्याआधी पंधरा वर्ष म्हणजे १८८० साली पुण्याचे महात्मा जोतिराव फुले हे रायगडावर गेल्याचे आणि तिथे त्यांनी शिवरायांची समाधी शोधून काढल्याचे महत्त्वपूर्ण ऐतिहासिक दस्तावेज उपलब्ध झाले आहेत.




**महात्मा फुलेंनी शिवाजी महाराज घराघरांत पोहचवले**

महात्मा फुले यांनी १८६९ मध्ये मराठी मराठी भाषेतील शिवचरित्र (पोवाडा रूपी) लिहून प्रकाशित केले. त्यामाध्यमातून त्यांनी शिवाजी महाराजांचा अभिमानास्पद वारसा घराघरात पोहोचवला. छपाईची सुरूवात झाल्यापासूनचे मराठीतले हे पहिले शिवचरित्र आहे. सत्यशोधक चळवळीच्या प्रेरणा सांगताना त्यांनी शिवरायांना महत्त्वाचे स्थान दिले आहे. त्यांच्या सगळ्या लेखनात, आणि भाषणांमध्ये शिवरायांचा प्राधान्याने उल्लेख आढळतो. या शिवचरित्राच्या आजवर २५ हून अधिक आवृत्त्या प्रकाशित झालेल्या आहेत. त्याची भाषांतरंही विविध भाषांमध्ये झालेली आहेत.

**शिवसमाधी शोधली, शिवजयंती उत्सव सुरू केला**

महात्मा फुले हे १८८० मध्ये पुण्यातून चालत रायगडावर गेले. तिथे झाडा-झुडपात हरवलेली आणि पालापाचोळ्यात दिसत नसलेली शिवरायांची समाधी जोतिरावांनी मोठ्या कष्टाने शोधली. त्याठिकाणी साफसफाई केली व शिवरायांच्या समाधीवर फुले वाहिली. ही माहिती त्यांनी पुण्यात येऊन सारसबाग जवळ असलेल्या हिराबागेत आयोजित केलेल्या शिवसमाधी विषयक सभेत स्वतः सांगितल्याची नोंद मिळाली आहे. या सभेत चाफळकर स्वामी, गंगारामभाऊ म्हस्के आदी मान्यवर पुणेकरांची भाषणे झालेली होती. त्याच सभेत शिवजयंती उत्सव सुरू करण्याचा विचार महात्मा फुलेंनी मांडला. त्याला सर्वानुमते पाठिंबा देण्यात आला. त्या बैठकीत शिवजयंतीसाठी लोकवर्गणी जमवण्याचा निर्णय झाला. एकूण २७ रूपये त्या सभेत जमले. त्यातील तीन रुपये स्वतः जोतिरावांनी दिले होते.

१८८० साली पुण्यात आणि रायगडावर शिवजयंती उत्सवाची जोतिरावांनी सुरूवात केली. त्यांचे सहकारी कामगार नेते रावबहादूर नारायण मेघाजी लोखंडे यांनी मुंबईच्या लालबाग आणि परळ या गिरणी कामगारांच्या वस्त्यांमध्ये शिवजयंती उत्सव सुरू केला. हा उत्सव सत्यशोधक मंडळी अतिशय भव्य प्रमाणात करत असत.

पोलिस खात्याचे अहवाल, सत्यशोधक चळवळीचे दस्तावेज, पुरावा लेखागारातील कागदपत्रे आणि सत्यशोधक माधवराव बागल यांनी १९३३ साली सत्यशोधक समाज हिरक महोत्सव ग्रंथात केलेले लेखन, हे सर्व दस्तावेज असे सांगतात की, जोतिरावांनी १८८० साली देशात सर्वप्रथम शिवसमाधी शोधणं, तिचे सुशोभिकरण करणं आणि शिवजयंती उत्सव सुरू करणं, अशी महत्त्वपूर्ण ऐतिहासिक कामे केलेली आहेत. जामिन आणि मानपत्र याबाबतची नोंद तर खुद्द टिळकांनी केली आहे. तेव्हा आज आपण असे म्हटले पाहीजे की, शिवजयंती सुरू करणारे जोतिराव आहेत.

# सत्ता स्थापनेपूर्वीच बदली प्रक्रिया

### सामान्य प्रशासन विभागाचा कार्यक्रम तयार : ५ मे पासून सुरुवात



**गोंदिया:** जिल्हा परिषदेंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांच्या सार्वत्रिक बदल्यांचा कार्यक्रम सामान्य प्रशासन विभागाने घोषित केला आहे. जिल्हा परिषदेत १० मे रोजी सत्ता स्थापन होणार असून ५ ते १५ मे दरम्यान बदल्या करण्यात येणार आहेत. त्यामुळे बदल्यांमध्ये पदाधिकाऱ्यांचा हस्तक्षेप नसणार आहे.

राज्य शासनाच्या १५ मे २०१४ च्या शासन निर्णयान्वये जिल्हा परिषदेत कार्यरत गट क आणि गट ड मधील कर्मचाऱ्यांच्या बदल्या ५ ते १५ मे या कालावधीत करण्याचे निर्देश आहेत. त्यानुसार जिल्हा परिषदेत गट क आणि ड मध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांच्या बदल्यांसाठी समुपदेशन कार्यशाळा आयोजित करण्यात येणार असून त्याचा कार्यक्रम जिल्हा परिदेच्या सामान्य प्रशासन विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी नरेश भांडारकर यांनी जाहीर केला आहे. सामान्य प्रशासन विभागाची कार्यशाळा ५ मे रोजी सकाळी १० ते दुपारी १२, वित्त विभाग ५ मे रोजी सकाळी १२ ते दुपारी १, कृषी विभाग ५ मे रोजी १ ते २, लघु पाटबंधारे विभाग ५ मे रोजी दुपारी ३ ते ४, बांधकाम विभाग ५ मे रोजी दुपारी ४ ते ५, पंचायत विभाग ६ मे रोजी सकाळी ११ ते २, महिला बालकल्याण विभाग ६ मे रोजी ३ ते ३.३०, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग ६ मे रोजी ३.३० ते ४, पशुसंवर्धन विभाग ६ मे रोजी चार ते ४.३०, शिक्षण विभाग (प्राथ.) ६ मे रोजी दुपारी ४.३० ते ६ आणि आरोग्य विभागाची कार्यशाळा ९ मे रोजी सकाळी ११ ते दुपारी २२ वाजतापर्यंत घेण्यात येणार आहे.

# नवोदयच्या परिक्षेत मराठी भाषेच्या विद्यार्थ्यांवर अन्याय

**गोंदियाः** नवोदय विद्यालयासाठी सन २०२२-२३ या शैक्षणिक सत्रासाठी घेण्यात आलेल्या प्रवेश परिक्षेत मराठी माध्यमांचे विद्यार्थी प्रश्नपत्रिकेत आलेल्या हिंदी भाषेच्या शब्दामुळे ५ प्रश्नांच्या उत्तरात गोंधळले गेल्याचे ३० एप्रिल रोजी झालेल्या परिक्षेदरम्यान समोर आले आहे.या प्रश्नामुळे मराठी भाषेतील विद्यार्थ्यांवर अन्याय झाल्याने त्या प्रश्नांचे गुण देण्यात यावे अशी मागणी पुढे आली आहे.

नवोदय प्रवेश परिक्षेच्या गणित विषयातील प्रश्न क्रमांक ४६,४७,५१,५९,५०(एफ)मध्ये पहिंदी शब्दांचा वापर करण्यात आल्याने मराठी भाषेतील विद्यार्थी गोंधळले गेली आणि ५ गुणांनी मागे पडले.ज्या प्रश्नात हिंदी शब्द आलेत,त्या प्रश्नांचे सरासरी साडेसात गुण विद्यार्थ्यांना देण्यात यावे अशी मागणी पालकांनी केली आहे.महाराष्ट्र शैक्षणिक परिक्षा मंडळाने या विद्यार्थ्यावर अन्याय न करता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाप्रमाणे चुकीच्या प्रश्नांचे गुण द्यावे अन्यथा आंदोलनाचा मार्ग पत्करावा लागेल असा इशारा पालकांनी दिला आहे.

# श्रीलंकेची मुलगी गोंदियाची सून!



**गोंदिया :** गोंदियात आली फॉरेनची पाटलीन! दिग्दर्शन प्रदीप गोंसाविकर यांची फॉरेनची पाटलीन हा सिनेमा आपण बघितलाच असेल, यात एक विशेष तरुणी भारतीय मुलाशी लग्न करते. गावाचा विकास घडवून आणायचे प्रयत्न करत असते. या सिनेमाला साजेल, अशी हुबेहुब प्रसंग गोंदियात घडला आहे. गोंदिया जिल्ह्याच्या दतोरा गाव-ातील उमेश कांबळे या तरुणाने श्रीलंकेतील रत्न मेनिके या तरुणीशी प्रेमविवाह केला आहे. आता या जोडप्याने महाराष्ट्रात धम्माचा प्रसार- प्रचार करण्याचा निर्धार केला आहे. यात गोंदियातील तरुणाने सातासमुद्रा पार गावातील तरुणी आपल्या गावात लग्न करून, आणल्याने कुतूहलाचा विषय बनला आहे.

गोंदियाच्या दतोरा गावातील उमेश कांबळे हे रेल्वे विभागात नोकरीला असून, पेशाने शिक्षिका असलेल्या श्रीलंकेतील रत्न मेनिके या तरुणीशी २ वर्षाआधी फेसबुक वरून मैत्री झाली. त्यांचे प्रेम जुडत २ महिन्याच्या आधीच लग्न करण्याचे ठरले. यासाठी दोघांनी आपआपल्या घरी लग्नाचा प्रस्ताव दिला आणि मग रत्न मेनिके यांनी भारतात येण्याचे ठरविले. अखेर घरच्याची सहमती मिळवत उमेश आणि रत्न मेनिके यांचा १८ एप्रिलला श्रीलंकेतील बुकामुना गावात लग्न झाले आहे. दरम्यान उमेश व रत्न मेनिके यांचे लग्न गोंदियात परतताच घरच्यांनी स्वागत समारंभ करण्याची तयारी करत उमेश आणि रत्न मेनिके यांचा स्वागत समारंभ पार पाडला. आता त्यांनी महाराष्ट्रात धम्माचा प्रचार करत जीवन जगण्याचा निर्धार केला आहे.

दूसरीकडे आपल्या गा-वात आणि घरात फॉरेनची मुलगी आल्याने गावकऱ्यांना आणि उमेशच्या घरच्यांना देखील आनंद झाला आहे. तर उमेश आणि मेनिके या बुद्धिष्ठ असून त्यांना महाराष्ट्रात धम्माचा प्रचार करायचा असल्याने त्यांनी रत्न मेनिकेशी लग्न करण्याचे ठरविले आहे. आता गोंदियात या फॉरेनच्या पाटलीनची चर्चा होऊ लागली आहे.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# कामगार आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर




डॉ बाबासाहेब आंबेडकर एक महानायक आहेत. त्यांनी या देशातील उपेक्षित समाजासाठी जे कार्य केले त्याला तोड नाही. बाबासाहेबानी जातीप्रथा नष्ट करण्याकरिता जेवढ काम केल आहे तेवढेच काम विविध क्षेत्रातील सर्वसामान्य उपेक्षित घटकांसाठी केलेलं आहे. शेतकरी, महिला, कामगार (संघटित-असंघटित) या व्यतिरिक्त एक पत्रकार, एक अर्थतज्ञ,, समाजकारणी, राजकारणी, धर्मपंडित, शिक्षण तज्ञ अशा अनेक क्षेत्रात बाबासाहेबांनी अतुलनीय कार्य केले आहे. यापैकी कामगारांच्या कल्याणात काय यो-गदान आहे हे बघण्याचा प्रयत्न करूया...

**स्वतंत्रमजूरपक्ष:-** डॉ बाबासाहेबांनी कामगार चळवळीला नवीन दिशा देण्याचा प्रयत्न केला आहे. कामगारांच्या समस्या राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर मांडता यावे म्हणून त्यांनी १५ ऑगस्ट १९३६ ला स्वतंत्र मजूर पक्ष स्थापन केला. या पक्षात सर्वच जातीधर्माचे मजूर होते. या पक्षाच्या जाहीरनाम्यात शेतकरी व मजूर यांची संघटना बांधून त्यांचे राहणीमान सुधारण्याचा प्रयत्न करणे, सामाजिक सुधारणाकरणे, जमीनधारा पद्धती अन्यायी असल्यामुळे ती बदलणे, कृषी सुधारणा, ग्राम संघटना या आणि अश्या अनेक महत्वाच्या मुद्द्यावर भर देण्यात आला होता. १९३७ मध्ये मुंबई आणि सी. पी. अँड बेरार प्रदेशातिल निवडणूका मजूर पक्षाने लढविले. निवडणुकीत हा पक्ष दुसऱ्या क्रमांकावर राहिला. बाबासाहेब विधानसभेचे विरोधी नेते म्हणून निवडल्या गेले. शासनाने सप्टेंबर १९३८ मध्ये मुंबई विधानसभेत कामगारांच्या संपाला बेकायदेशीर ठरविणारा 'औद्योगिक विवाद विधेयक' आणला. बाबासाहेबानी विधानसभेत या कायद्याला 'मजूरांकरिताचा काळा कायदा' म्हणून उल्लेख करतांना ते म्हणाले, "हे विधेयक म्हणजे कामगारांचे नागरिक स्वतंत्र हनन विधेयक आहे', कामगार संपावर प्रतिबंध घालणे म्हणजे कामगारांना अपंग आणि गुलाम बनविणे होय. बाबासाहेब विधानसभेत या कायद्याला विरोध करूनच थांबले नाही तर ७ नोव्हेंबर १९३८ ला कामगारांचा संप घडवून आणला. त्यावेळेसचा तो सर्वात मोठा संप होता. या ऐतिहासिक संपामुळे बाबासाहेब कामगारांचे नेते म्हणून उदयास आले.

**मजूरमंत्री:-** सन १९४२ मध्ये व्हाईसराय जनरलच्या मंत्रीमंडळात त्यांची मजूर मंत्री म्हणून निवड करण्यात आली. १९४२ - ४६ या काळात मजूर मंत्री म्हणून कामगार कल्याणविषयक धोरणात्मक निर्णय घेण्याचे काही काम केले आहेत...... १) कामगारांचे आठवड्यातिल कामाचे तास ५४, वरून ४८ तास केले. २)कारखान्यातिल ओव्हर टाईमच्या बाबतीत, वेतनाचा दर दिडपट केला. ३) २१ फेब्रुवारी १९४६ ला 'फॅक्ट्रीज ॲक्ट' (१९३६) मध्ये सुधारणा करून कामगारांना संप करण्याचा अधिकार दिला. ४) कामगारांना पगारी रजा असाव्यात अशी सुधारणा त्यांनी १९४४ मध्ये 'फॅक्ट्रीज ॲक्ट' मध्ये केली. बाबासाहेबांनी मजूर मंत्री म्हणूनही काही उल्लेखनिय कामे केलीत. तर आज स्वतंत्र भारतात मजूर मंत्री कोण आहे हे जिथं कळत नाही तिथं सरकारी पातळीवर डोंबल्याचा कामगार कल्याणाचा विचार होणार आहे.

**स्त्रीकामगारांच्याबाबतीत :-** भारतातील नव्हे तर जगा-तील स्त्रिया कायम उपेक्षित राहिल्या आहेत त्यापासून कामगार स्त्रिया सुद्धा सुटल्या नाहीत. बाबासाहेबानी कामगार स्त्रियांच्या जीवनात मजूर मंत्री म्हणून आमुलाग्र बदल घडविणारे कायदे निर्माण केलेत, ते असे.... १) प्रसूती काळातील रजा पूर्ण पगारी असावी. २) महिला - पुरुष कामगारांना समान वेतनाची तरतूद केली. ३) कायद्याने स्त्रियांना कारखान्यात रात्री काम करण्यास बंदी.

**आज महिला** - पुरुष कामगार-कर्मचाऱ्यांना ज्या सुविधा मिळत आहेत त्या कोणामुळे मिळत आहेत, हे त्यांच्या पर्यंत पोहचलेच नाहीत किंवा त्यांना ते माहित करुन घेण्याची गरज पडली नाही. बाबासाहेबांचे गुरु महात्मा फुले व सावित्रीमाई फुलेनी स्त्रियांना शिक्षण देवून सुशिक्षित केले तर बाबासाहेबांनी 'सुरक्षित आणि सक्षम' केले. हे विसरून कसे चालणार.

**कामगारविम्याचेजन्मदाते :-** सरकारी नोकरी किंवा खाजगी कंपनीत नौकरदाराचा जो विमा काढल्या जातो त्या विम्याचे जन्मदाते डॉ बाबासाहेब आंबेडकर आहेत. दुसऱ्या महायुद्धात जखमी झालेल्या कामगारांना व मृत्यू झालेल्या कामगारांच्या कुटूंबाला मदत व्हावी म्हणून मभरपाई व विमा संरक्षण बिल म ३१मार्च १९४३ ला विधानसभेत मंजूर करून घेतले.

**कायदामंत्री :-** स्वतंत्र भारताचे पहिले कायदा मंत्री म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. बाबासाहेबांना कामगारांच्या समस्याची जाणीव होती, कामगारांचे कल्याण व्हावे या करिता त्यांची नेहमीच तळमळ असे, म्हणून त्यांनी कायदा मंत्री म्हणून, 'औधोगिक कलह कायदा १९४७', 'कारखाने अधिनियम १९४८', 'किमान वेतन कायदा १९४८', हे कायदे तयार करून घेतलेत.

संविधान तयार करतांना कामगारांच्या हिताच्या दृष्टीने राष्ट्रीय श्रम हा विषय संविधानाच्या समवती सूचित समाविष्ट केला आहे.

बाबासाहेबानी स्वतंत्रपूर्व भारतात आणि स्वतंत्र भारतात कामगारांच्या कल्याणाकरिता जसे आंदोलन केले तसेच संविधानिक चौकटीत राहून काम करण्याची संधी मिळताच कामगार - मजूरांच्या दृष्टीने कायद्यात सुधारणा केल्या, नवे हितकारक कायदे करून कामगारांना न्याय मिळवून दिला; त्यामुळेच ते कामगारांचेही नेते ठरतात. स्वतःच स्वतःला कामगार नेते म्हणावना?यानी जेवढे काम कामगारांकरिता केले नाहीत तेवढे काम भारतीयपुत्र - कामगारहितेशी भीमाने केलेत, हे कामगार - कर्मचाऱ्यांनी समजून घ्यावे..

जागतिक कामगार दिनानिमित्त डॉ बाबासाहेबांना विनम्र अभिवादन. ज्ञानाचा आणि समतेचा दिवा सतत तेवत ठेवू या..

**व्याख्याते अनिल भुसारी,**
**तुमसर, जि. भंडारा ८९९९८४३९७८**

# खत व बियाण्यांची कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्यांवर कारवाई करा–पालकमंत्री

**गोंदिया :** खरीप हंगाम सुरू होण्यास फार थोडा अवधी बाकी असून शेतकऱ्यांना खत व बियाणे योग्य प्रमाणात उपलब्ध व्हायला हवीत. खत व बियाण्यांची कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्यांवर कृषी विभागाने कडक कारवाई करावी असे निर्देश पालकमंत्री प्राजक्त तनपुरे यांनी दिले.



राज्यमंत्री नगरविकास, ऊर्जा, आदिवासी विकास, उच्च व तंत्र शिक्षण, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन तथा पालकमंत्री गोंदिया प्राजक्त तनपुरे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात खरीप हंगाम आढावा बैठक घेण्यात आली त्यावेळी ते बोलत होते. यावेळी खासदार सुनील मेंढे, आमदार डॉ.परिणय फुके, विजय रहांगडाले, विनोद अग्रवाल, मनोहर चंद्रिकापूरे, सहसराम कोरोटे, जिल्हाधिकारी नयना गुंडे, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी हिंदुराव चव्हाण, अग्रणी बँक व्यवस्थापक उदय खर्डेनवीस, नाबार्डचे जिल्हा विकास व्यवस्थापक नीरज जागरे उपस्थित होते.जिल्ह्यात खताचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी सांगितले.

खरीप हंगाम सन २०२२–२३ साठी १ लाख ७ हजार ४७५ मेट्रिक टन खताची मागणी आहे. आयुक्तालयांकडून ६६ हजार ६५० मेट्रिक टन आवंटन मंजूर करण्यात आले आहे. मागील वर्षाचा एकूण शिल्लक साठा १८ हजार ७०९ मेट्रिक टन एवढा आहे. तर सर्व पीक मिळून ४७ हजार ५२२ क्विंटल बियाण्यांची मागणी आहे. बोगस बियाणे, खत व औषधी विक्रेत्यांवर कडक कारवाई करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. कृषी सेवा केंद्रात प्रमाणित बियाणेच विक्री केले जावे असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले.

पीक कर्ज वाटपाचा मुद्दा या बैठकीत चर्चेला आला. व्यापारी बँकांनी केवळ उद्दिष्टांच्या केवळ २४ टक्के पीक कर्ज वाटप केल्याबद्दल पालकमंत्र्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट पूर्ण न करणे ही गंभीर बाब असल्याचे पालकमंत्री म्हणाले. अशा बँकांवर कारवाई करण्याचे संकेत त्यांनी दिले. खरीप हंगाम सन २०२२–२३ साठी गोंदिया जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक १८५.२५ कोटी, ग्रामीण बँक ३६.३१ कोटी व राष्ट्रीयकृत व व्यापारी बँक ८९.६७ कोटी असे एकूण ३११ कोटी २३ लाखांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. हे उद्दिष्ट पूर्ण करून शेतकऱ्यांना पीक कर्ज उपलब्ध करून द्यावे असे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले.

# पांगोली नदी परिसरात दफनभूमीसाठी जागा उपलब्ध करून द्या

## जनशक्ती संघटनेचे एसडीओ व तहसीलदारांना निवेदन

**गोंदिया:** भारतीय संस्कृतीत मानवी पार्थिवावर स्मशानभूमित अग्निसंस्कार करण्याची परंपरा आहे. मात्र, शहरातील छोटा गोंदिया, गोविंदपुर, संजयनगर, मामा चौक विशेषत: छोटा गोंदिया परिसरात महानुभाव पंथीय समाज, आदिवासी समाज, घारपगारी समाज वास्तव्यात आहेत, असे ही समाज आहेत की जे स्मशानभूमित अग्निसंस्कार करीत नसून ते पार्थिवाला जमिनीत पुरतात. परंतु, दफनभूमी नसल्याने अनेक समस्येला समोर जावे लागत आहे. करीत शासनाने दफन भूमीसाठी शासकीय जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी जनशक्ती संघटनेच्यावतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांना निवेदन दिले आहे.



मृत्यूनंतर मानवी शरीरावर अंत्य संस्कार करण्याची प्रथा आहे. परंतु, विविध धर्मात वेगवेगळ्या पध्दतीने अंत्य संस्कार करण्यात येते. शिवाय काही नागरिकांच्या अंतीम ईच्छेनुसारही निधनानंतर अग्नी न देता माती देत असतात. परिसरातील पांगोली नदीच्या पात्रात उपलब्ध जागेत मानवी मृत शरीर दफन करण्यात येत होते. मात्र आता छोटा गोंदिया परिसरातील शेतकऱ्यांच्या शेती विकासासाठी व परिसरातील भुजल पातळी वाढविण्याच्या दृष्टीकोनातून पांगोली नदी पात्रात शासनाकडून बंधारा बांधण्यात आलेला आहे. त्यामुळे, परिसरात मृत शरीर जमिनीत पुरण्यासाठी, दफन करण्यासाठी आता जागा उपलब्ध नसल्याने नागरिकांना अडचण निर्माण झालेली आहे.

यासंदर्भात जनशक्ती बहुउद्देशिय सामाजिक संस्थेच्या शिष्टमंडळाने उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांची भेट घेऊन जागा उपलब्ध करून देण्यासाठी निवेदन दिले. शिष्टमंडळात जनशक्ती बहु. सामाजिक संगठनेचे संयोजक तिर्थराज ते. उके, मार्गदर्शक संगठक इंजि. मयूर मेर्शाम, अध्यक्ष अनिल शरणागत, प्रसिद्धी प्रमुख आशिष उईके, कोषाध्यक्ष देवेंद्र शेंडे, सचिव रोशन पाचे, सदस्य अनिल ढोमने आदी संगठनेचे पदाधिकारी, सदस्यगण यांचा समावेश होता

# रामाटोला येथे पालकमंत्र्यांच्या हस्ते नवतेजस्विनी दुग्ध शीतकरण केंद्राचे भूमीपूजन




**गोंदिया :** जिल्हाधिकारी कार्यालय द्वारा नियोजन विभाग गोंदिया सहाय्यीत महिला आर्थिक विकास महामंडळ गोंदिया आणि अदानी फाऊंडेशन तिरोडा द्वारे संचालित जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजनेअंतर्गत सूक्ष्म प्रकल्प योजनेअंतर्गत मंजूर नवतेजस्विनी दुग्ध शीतकरण केंद्र रामाटोला (काचेवानी) येथे पालकमंत्री प्राजक्त तनपुरे यांच्या हस्ते भूमीपूजन करण्यात आले.

यावेळी जिल्हाधिकारी नयना गुंडे, अपर जिल्हाधिकारी राजेश खवले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शीतल पुंड, जिल्हा नियोजन अधिकारी कावेरी नाखले, उपविभागीय अधिकारी पूजा गायकवाड, माविमचे जिल्हा समन्वय अधिकारी संजय संगेकर उपस्थित होते.

पालकमंत्री श्री तनपुरे यांनी यावेळी तिरोडा व गोंदिया येथील दुग्ध संकलनाच्या विकासावर सर्वांगीण विकासाची संकल्पना मांडून सर्व प्रकारच्या मदतीचे आश्वासन दिले. तसेच तिरोडा व गोंदिया येथील दुग्ध संकलनाच्या विकासावर भर देवून पशुधन वाढविण्याकरीता शासकीय योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रास्तविक माविमचे जिल्हा समन्वय अधिकारी संजय संगेकर यांनी केले. उपस्थितांचे आभार सहाय्यक सनियंत्रण अधिकारी प्रदिप कुकडकर यांनी मानले. संचालन प्रभाग समन्वयक सारिका बन्सोड यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहाय्यक जिल्हा समन्वय अधिकारी सतीश मार्कंड, योगेश वैरागडे, राम सोनवणे, हेमंत मेश्राम, तृप्ती चावरे, शिल्पा येडे, अनिता आदमने, मुन्ना बिसेन, नामदेव बांगरे, संदिप राणे, भुपेश हरिणखेडे, तिरोडा तालुक्यातील सर्व लोकसंचालित साधन केंद्राचे व्यवस्थापक, सहयोगिनी, लेखापाल यांनी सहकार्य केले.

# सेजगाव सेवा सहकारी संस्थेवर भाजप-राकाँची सत्ता

**एकोडी :** जवळील सेजगाव येथे नुकत्याच पार पडलेल्या विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या निवडणुकीत संचालकांची बिनविरोध निवडणूक पार पडली. दरम्यान आज अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाची निवडणूक पार पडली. यामध्ये नविन समीकरण तयार झाले असून भाजपकडे अध्यक्ष तर राष्ट्रवादीकडे उपाध्यक्ष देण्यात आले. अध्यक्षपदी बंसीलाल पारधी तर उपाध्यक्ष डॉ.किशोर पारधी यांची निवड झाली.

विविध सेवा सहकारी संस्था सेजगांवच्या निवडणुकीत संचालकांची बिनविरोध निवडणूक पार पडली. दरम्यान आज अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाची निवडणूक पार पडली. संस्थेचे राकॉ–भाजपने समीकरण जुळवून सत्ता स्थापन केली आहे.

दरम्यान अध्यक्षपदी भाजपचे बंशीलाल पारधी व उपाध्यक्ष राष्ट्रवादीचे डॉ.किशोर पारधी याची निवड करण्यात आली आहे. या निवडीला सरपंच के.के. पारधी, उपसरपंच स्वप्नील महाजन, एस.डी.पारधी, ज्योती शरणागत, गौरी पारधी, रामचंद्र पारधी, नेतलाल मालाधारी, श्यामराव गायधने, भाऊलाल टेंभरे, गोटे, डॉ.बंसत भगत, मिनेश्वरी पारधी, टि.एल.पारधी, के.बी.सोनेवाने, डॉ.चुन्नीलाल भगत, चंदुलाल बिसेन, फुलचंद पारधी, ज्ञानेश्वर पटले, शिशुपाल पारधी, खेमचंद राऊत, रयनबाई रहांगडाले, डॉ.त्रिलोक पारधी, सचिव कनपटे, निवडणुक अधिकारी नागपूरे यांनी सहकार्य केले. सर्व नवनिर्वाचित अध्यक्ष, उपाध्यक्ष व संचालकांचे गावकऱ्यांनी अभिनंदन केले आहे. विशेष म्हणजे, भाजप–राकाँच्या युतीने तालुक्यातील राजकीय वर्तुळात झाल्याने भविष्यात असेच प्रयोग होत राहतील, अशीही चर्चा सुरू झाली आहे.



### ग्रामीण भागाच्या विकासासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही–पालकमंत्री कदम

**भंडारा :** स्थानिक स्वराज्य संस्था मध्ये जिल्हा परिषद व पंचायत समिती यांच्या मार्फत ग्रामीण भागातील विकास योजना राबविल्या जातात. ग्रामीण भागाच्या विकासासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही, असे आश्वासक प्रतिपादन पालकमंत्री डॉ. विश्वजीत कदम यांनी आज केले.

"हीरक महोत्सव समारंभ" जि. प. भंडाराचे सभागृहात संपन्न झाला. त्यावेळी ते बोलत होते. राज्यातील जिल्हा परिषदा व पंचायत समित्या स्थापनेस ६० वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने "हीरक महोत्सव समारंभ" कार्यक्रमाचे उद्घाटन पालकमंत्री श्री. कदम यांनी केले. यावेळी लाल बहादुर शास्त्री विद्यालयातील विद्यार्थीनीने सांस्कृतिक गित व नृत्य सादर केले.

# मागास प्रवर्गाच्या चौकशीसाठी आयोग गठीत

## संबंधित अभिवेदन व सूचना १० मे पर्यंत आमंत्रित

**गोंदिया:** महाराष्ट्र राज्यात मागास प्रवर्गाच्या बाबतीत स्थानिक स्वराज्य संस्थानिहाय राजकीय मागासलेपणाच्या स्वरुपाची व परिणामांची समकालीन अनुभवधिष्ठीत सखोल चौकशी करण्यासाठी समर्पित आयोग स्थापन करण्याचे मा. सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिले आहेत. या निर्देशानुसार महाराष्ट्र शासनाच्या ग्राम विकास विभागाने दि. ११ मार्च २०२२ रोजीच्या अधिसूचनेद्वारे "महाराष्ट्र राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नागरीकांच्या मागास प्रवर्गाच्या आरक्षणासाठी समर्पित आयोग" गठीत केलेला आहे. "महाराष्ट्र राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नागरीकांच्या मागास प्रवर्गाच्या आरक्षणासाठी समर्पित आयोग" दिलेल्या कार्यकक्षेप्रमाणे, स्थानिक स्वराज्य संस्थांनिहाय राजकीय मागासलेपणाच्या स्वरूपाची व परिणामांची समकालीन अनुभवधिष्ठीत सखोल चौकशी करण्याच्या अनुषंगाने नागरीकांकडून, संस्थांकडून, संघटनाकडून व नोंदणीकृत राजकीय पक्षांकडून अभिवेदन/ सूचना मागविण्यात येत आहे. इच्छूकांनी आपले अभिवेदन/ सूचना लेखी स्वरूपात dcbccmh@gmail.com याई–मेल अथवा +९१२२२४०६२१२१ या व्हाट्सअॅप क्रमांकावर किंवा ११५, पहिला माळा, ए १ इमारत, वडाळा टर्मिनल, वडाळा आर.टी.ओ. जवळ, वडाळा, मुंबई – ४०००३७ या पत्त्यावर १० मे २०२२ पर्यंत पाठविण्याचे आवाहन आयोगातर्फे करण्यात आले आहे.

### ७ मे रोजी जिल्हयात राष्ट्रीय लोक अदालत

**वाशिम :** ७ मे २०२२ रोजी जिल्हा सत्र न्यायालय, वाशिम आणि सर्व तालुका न्यायालयामध्ये सकाळी १०:३० ते संध्याकाळी ५:३० वाजेपर्यंत राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. या राष्ट्रीय लोक न्यायालयामध्ये दाखल–पुर्व व प्रलंबित प्रकरणे सुनावणीसाठी ठेवण्यात येणार आहेत. यामध्ये धनादेश अनादर प्रकरणे, बँकेचे कर्ज वसूली प्रकरणे, कामगाराचे वाद, विद्युत आणि पाणी देयक बद्दलचे प्रकरणे (आपसात तडजोड करण्याजोगे प्रकरणे वगळून), आपसात तडजोड करण्याजोगे फौजदारी प्रकरणे, मोटार अपघात नुकसान भरपाई प्रकरणे, वैवाहिक वाद, भु–संपादन प्रकरणे, इतर दिवाणी प्रकरणे, मनाई हुकुमाचे दावे, विशिष्ट पुर्वबंध कराराची पूर्तता विषयक वाद या प्रकरणांचा समावेश असणार आहे.

ज्या पक्षकारांची वर नमुद प्रकारची प्रकरणे न्यायालयात प्रलंबित असतील किंवा खटलापूर्व प्रकरणे न्यायालयात दाखल आहेत, त्यांनी ७ मे २०२२ रोजी आपली प्रकरणे आपसात करण्यासाठी या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये सहभाग नोदविण्याकरीता संबंधित न्यायालय, तालुका विधी सेवा समिती अथवा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, वाशिम यांच्याशी संपर्क साधावा. या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये सहभागी होऊन आपले वाद सामोपचाराने कायमचे मिटवावेत. असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती एस. एस. सावंत, आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव यांनी केले आहे.

## महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभाग, नागपूर
## ई-निविदा सुचना क्रमांक १२ सन २०२२-२३

**कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभाग, बांधकाम संकुल, सिव्हील लाईन्स, नागपूर** (दुरध्वनी क्र.०७१२–२५६०५६) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत विद्युत कंत्राटदाराकडून खालील (क्र.०१ ते ०२) कामाकरीता ब–१ नमुन्यातील निविदा ई–प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवत आहेत. निविदा कागदपत्र संकेत स्थळावर http://mahatenders.gov.in व www.mahapwd.gov.in "Pay PWD Online" येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभाग, नागपूर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| Sr. No. | Name of Work | Estt.No. | Tender Amount |
|---|---|---|---|
| 1 | Providing E.I.to newly Constructed Forest Rest House at Deori Ta.Deori Distt.Gondia | 1752/GND/ 2021-22 | 1051917/- |
| 2 | Providing Renovation to EI at NIC Room in the premises of Collector office Gondia | 51/GND/ 2022-23 | 855902/- |

निविदा उपलब्ध कालावधी:– दिनांक ०२/०५/२०२२ ते १६/०५/२०२२ निविदा सादर करण्याचा व उघडण्याचा दि. १७/०५/२०२२ खालील संकेतस्थळावर ई–निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

१. www.mahatenders.com (NIC portal) व www.mahapwd.gov.in "Pay PWD Online"

(सदर निविदेमध्ये काही बदत होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)

२. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभाग, नागपूर कार्यालयातील सुचना फलक.

**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभाग,**
**नागपूर**

क्र.1जिमाका/गों/जाहि/०२/२०२२

## ग्रामपंचायत कार्यालय दवडीपार
## पंचायत समिती गोरेगाव
## ई-निविदा

निविदा कं. १ दिनांक :–०२/०५/२०२२

ग्रामपंचायत कार्यालय दवडीपार पंचायत समिती गोरेगाव येथिल सन २०२२–२३ मध्ये विविध कामे/विकास कामाकरीता तसेच म.ग्रा.रो.ह.यो. अंतर्गत होणाऱ्या कामाकरिता लागणारेसाहीत्य पुरवठा करण्या करिता ई–निविदा पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई–निविदाची विस्तृत माहीती महाराष्ट्र शासनाचे संकेत स्थळ www.mahatenders.gov.in वर उपलब्ध असुन विस्तृत माहिती ग्रा.पं. कार्यालयात उपलब्ध आहे.

### ई–निविदा तपशिल

| | | |
|---|---|---|
| १ | ई–निविदा प्रसिध्दी व दाखल दिनांक | दिनांक ०२/०५/२०२२ पासुन |
| २ | ई–निविदा अंतिम दिनांक | दिनांक ०७/०५/२०२२ ला. ५.०० वा.पर्यंत |
| ३ | ई–निविदा उघण्याची दिनांक | दिनांक ९/०५/२०२२ ला १०. ०० वा.शक्य झाल्यास |

विस्तृवत माहीती ग्रामपंचायतच्यान नोटीस बोर्डावर बघायला मिळेल तसेच अटी व शर्ती सर्वांना लागू राहतील.

**सरपंच**
**ग्रमपचायत कार्यालय दवडीपार.**

**ग्रामसेवक**
**ग्रामपचायत कार्यालय दवडीपार.**



# जिल्ह्याच्या सर्वकष विकासाचा आराखडा तयार करा–पालकमंत्री तनपुरे




**गोंदिया :** सन २०२२–२३ या आर्थिक वर्षात जिल्हा विकासाच्या योजनांचा सर्वकष आराखडा तयार करुन खर्च विहित कालावधीत करण्याची जबाबदारी कार्यान्वित यंत्रणांची असून लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन विकास कामांचे नियोजन करावे असे निर्देश पालकमंत्री प्राजक्त तनपुरे यांनी दिले. आर्थिक वर्ष सन २०२०–२१ मध्ये यंत्रणांनी शंभर टक्के खर्च केल्याबद्दल पालकमंत्री व सभागृहाने प्रशासनाचे अभिनंदन केले.

जिल्हा नियोजन समितीची सभा राज्यमंत्री नगरविकास, ऊर्जा, आदिवासी विकास, उच्च व तंत्र शिक्षण, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन तथा पालकमंत्री गोंदिया प्राजक्त तनपुरे यांच्या अध्यक्षतेखाली शनिवार ३० एप्रिल रोजी जिल्हा नियोजन समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया येथे आयोजित करण्यात आली त्यावेळी ते बोलत होते. जिल्हा नियोजनच्या निधीमधून गुणवत्तापूर्ण कामे करण्यावर भर देण्यात यावा असेही ते म्हणाले. यावेळी खासदार सुनील मेंढे, आमदार डॉ. परिणय फुके, विजय रहांगडाले, विनोद अग्रवाल, मनोहर चंद्रिकापूरे, सहसराम कोरोटे, जिल्हाधिकारी नयना गुंडे, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक विश्व पानसरे, जिल्हा नियोजन अधिकारी कावेरी नाखले व समितीचे सदस्य उपस्थित होते. सन २०२०–२१ या आर्थिक वर्षात सर्वसाधारण योजनेत १६५ कोटी, अनुसूचित जाती उपयोजना ४४ कोटी व आदिवासी उपयोजना ४५ कोटी ९९ लाख ६९ रुपये असा एकूण निधी अर्थसंकल्पित करण्यात आला होता. कार्यान्वित यंत्रणांकडून २५४ कोटी ९९ लाख ६९ हजार खर्च या आर्थिक वर्षात करण्यात आला. सन २०२२–२३ या आर्थिक वर्षात सर्वसाधारण योजना २०० कोटी, अनुसूचित जाती उपयोजना ४४ कोटी, आदिवासी उपयोजना ४८ कोटी ९९ लाख ९० हजार असा एकूण २९२ कोटी ९९ लाख ९० कोटी नियतव्यय मंजूर आहे.

मागील आर्थिक वर्षात यंत्रणांनी शंभर टक्के खर्च केल्याबद्दल सभागृहाने प्रशासनाचे अभिनंदन केले. नक्षलग्रस्त यादीतून काही तालुके वगळण्यात आल्याचा मुद्दा सभागृहात चर्चेला आला तेव्हा गृहमंत्री व गृहसचिवांना भेटून जिल्ह्यातील सर्व तालुके नक्षलग्रस्त यादीत समाविष्ट करण्यात यावी यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे पालकमंत्र्यांनी सांगितले.

या बैठकीत मागील वर्षाच्या खर्चाला व इतिवृत्तास मंजुरी देण्यात आली. धान खरेदी गोडाऊन बांधण्यासाठी प्रत्येक विधानसभा निहाय दोन कोटी निधी ठेवावा अशी सूचना या बैठकीत मांडण्यात आली. सूचना चांगली असून यावर सकारात्मक विचार करण्यात येईल असे पालकमंत्री म्हणाले. सन २०२०–२१ या वर्षात कृषी व संलग्न सेवा, ग्रामीण विकास, सामाजिक व समूह सेवा, पाटबंधारे व पूरनियंत्रण, ऊर्जा विकास, उद्योग व खाण, परिवहन, सामान्य सेवा, सामान्य व आर्थिक सेवा, नाविन्यपूर्ण योजना, योजनांचे मूल्यमापन व सनियंत्रण आणि सूक्ष्म प्रकल्प योजनांचा खर्च शंभर टक्के झाला आहे.

समितीच्या बैठकीत १७ जानेवारी २०२२ रोजीच्या इतिवृत्तास मंजुरी देणे व इतिवृत्तातील कार्यवाही मुद्द्याचा आढावा घेणे, जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण योजना, अनुसूचित जाती उपयोजना, आदिवासी उपयोजना व आदिवासी उपयोजना बाह्यक्षेत्र २०२१–२२ अंतर्गत माहे मार्च २०२२ अखेर झालेल्या खर्चास मान्यता प्रदान करणे, जिल्हा वार्षिक योजना सन २०२२–२३ अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा माहे एप्रिल अखेर पर्यंत झालेल्या प्रगतीचा आढावा घेणे व अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणाऱ्या विषयावर चर्चा करण्यात आली.

# राज्यात एक लाख बोगस आदिवासी

**नवी दिल्ली:** आदिवासी समाजासाठी शासनाच्या विविध योजना राबविण्यात येतात. मात्र, या योजनांचा फायदा घेण्यासाठी बोगस आदिवासी तयार झाले आहेत. महाराष्ट्रात ही संख्या एक लाखाच्या घरात आहे. महाराष्ट्रासह आंध्र प्रदेश आणि तामिळनाडूमध्येही बोगस आदिवासींची संख्या अधिक आहे. अशांवर कारवाई करून खऱ्या आदिवासींपर्यंत लाभ पोहचविण्याची जबाबदारी राज्य शासनाची आहेफ, असे केंद्रीय राज्य ग्रामविकासमंत्री फग्गन सिंह कुलस्ते यांनी शनिवारी येथे सांगितले.



अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेच्यावतीने शनिवारी प्रेसक्लब येथील सभागृहात राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक घेण्यात आली. दिवसभर विविध पदाधिकाऱ्यांच्या बैठका घेण्यात आल्या. २४ एप्रिल रोजी महाराष्ट्र युवा परिषद शाखा संमेलन आणि महिला परिषद होणार आहे. 'आदिवासींना अनेक राज्यांत राजकीय आरक्षण नाही. आदिवासींच्या हक्कासाठी अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेच्या माध्यमातून लढा दिला जात आहे. शिक्षणक्षेत्रातही चांगले काम उभे राहत आहे. आदिवासी विकास विभागांतर्गत असलेल्या एकलव्य रेसिडेंशियल पब्लिक स्कूलच्या माध्यमातून शिक्षणाची गंगा घरोघरी पोहोचवली जात आहे', असे कुलस्ते यांनी सांगितले. अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेने ३० राज्यातील आदिवासींना एकत्रित आणण्याचे काम केले. १५ कोटी आदिवासींना जागरूक करण्यासाठी मोहीम राबविण्यात येत आहे. समाजात शिक्षणाचे प्रमाण वाढत आहे. अद्यापही खूप काम बाकी आहे. लवकरच मोठे संमेलन घेण्यात येईल, असे सोमजी डामोरे यांनी सांगितले.

# विशेष काम गिरीसाठी १८ पोलिसांचा गौरव

**गोंदिया:–** पोलिस विभागात कर्तव्य यावर असताना उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या जिल्ह्यातील १९ पोलिस अधिकारी व कमचाऱ्यांना पोलिस महासंचालकांचे सन्मानचिन्ह जाहीर करण्यात आले आहे.

पोलिस महासंचालक रजनीश सेठ यांनी सन २०२१ या वर्षाकरिता ३० एप्रिल रोजी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या पोलिसांसाठी सन्मानचिन्ह यादीत जाहीर केली. यात जिल्ह्यातील २ अधिकारी व १६ पोलिस कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

यात आमगावचे उपविभागीय पोलिस अधिकारी जालिंदरलिंनालकूल, पोलिस निरीक्षक प्रमोद घोगे, पोलिस हवालदार राष्ट्रपाल तुमडाम, रेखा धुर्वे, राजेश पटले, गुन्हे अन्वेषण विभागाचे निशिकांत लोंदासे, मनोहर चांदेवार, पोलिस नायक शिपाई दीपक सांदेल, पंकज चंद्रिकापुरे,धनराज डाहारे, नरेंद्रकुमार राऊत, संजय महारवाडे, चंद्रशेखर गणवीर, खेमराज कोरे, संतोष शेंडे, सचिन चव्हाण, रमेश उईके व दीपक क्षीरसागर यांचा समावेश आहे.

# भूमिहीन शेतकऱ्याचे सहकुंटूब आमरण उपोषण




**गोंदिया:** – महामार्गात गेलेल्या शेतीमुळे भूमिहीन झालेल्या अन्यायग्रस्त शेतकऱ्यांने बाजारभावाप्रमाणे मोबदला किंवा शासकीय नोकरी देण्याची मागणी वारंवार मागणी करुनही न्याय मिळत नसल्याने अखेरीस ३० एप्रिल रोजी चौरागडे कुटूंबीयाने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण पुकारले आहे.

मोहाडी तालुक्यातील सातोना येथील शकुंतला राकेश चौरागडे यांची गट क्रमांक ५३, ०९ आराजी शेतीचा कोणताही मोबदला न देता महामार्ग प्राधिकरणाने जमीन संपादित केली. यासंदर्भात चौरागडे कुटुंबीयांनी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांना वारंवार पत्रव्यवहार करुन न्याय देण्याची मागणी केली.

परंतु गत तीन वर्षापसून त्यांना न्याय मिळालेला नाही. त्यामुळे अखेरीस जमिनीचा आजच्या बाजारभावाप्रमाणे मोबदला द्यावा किंवा परिवारातील एका सदस्याला शासकीय नोकरी द्यावी, अन्यथा ३० एप्रिलपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा चौरागडे कुटूंबीयांनी प्रशासनाला दिला होता. मात्र त्यानंतरही प्रशासनाने दखल घेतली नाही. त्यामुळे ३० एप्रिलपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सहकुटूब उपोषणावर बसले आह

# सामाजिक न्यायाच्या योजनांचा जागर



**गोंदिया :–** राज्याचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे मंत्री धनंजय मुंडे यांच्या संकल्पनेतून साकारलेला सामाजिक न्याय विभागाच्या योजनांचा जागर कार्यक्रम राज्यातील लाखो जनतेपर्यंत पोहोचला आहे. अमृत महोत्सव वर्षे तसेच १ मे महाराष्ट्र दिनाच्या औचित्य साधून राज्यातील प्रत्येक गावात योजनांची माहिती पोहोचविण्याचे उद्दिष्ट जागर कार्यक्रमांच्या माध्यमातून समाज कल्याण विभागाने ठरविण्यात आले होते. योजनांची माहिती व प्रसारासाठी विभागाने युद्धपातळीवर यंत्रणा कार्यान्वित केली होती. प्रत्येक तालुक्यातील प्रत्येक गावात विभागाच्या योजनांची माहिती पुस्तके, माहिती पत्रिका पोहोच करण्यात आली होती.

राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात त्या त्या जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या हस्ते या स्टॉलचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी उपस्थित असलेल्या सर्वांना समाज कल्याण विभागा कडून विविध योजनांची माहिती दिली जात होती. महाराष्ट्र दिनी राज्यात एकाच दिवशी बहुतांश ठिकाणी एकाच वेळी झालेल्या या कार्यक्रमाच्या निमित्ताने लाखो लोकांपर्यंत योजनांची माहिती उपलब्ध झाली आहे. झेंडा वंदनाच्या कार्यक्रम स्थळी सामाजिक न्याय विभागाच्या सर्व योजनांची माहिती देणारी माहिती पत्रिका तसेच माहिती पुस्तिका वाटप करण्यात आली. विभागाच्या योजनांच्या बाबतीत जनजागृती करून तळागाळातील गरजूंना लाभ मिळवून देणे हा यामागचा उद्देश आहे. दरम्यान आजच्या महाराष्ट्र दिनाच्या दिवशी झालेल्या या कार्यक्रमाचे समाजातील सर्व स्तरातून कौतुक झाले आहे,

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील समाज कल्याण विभागाचे उपक्रमाबद्दल अभिनंदन केले आहे.

पोलीस मुख्यालय, गोंदिया येथे आयोजित झेंडा वंदनाच्या प्रसंगी गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री प्राजक्त तनपुरे यांचे शुभ हस्ते श्रीमती नयना गुंडे जिल्हाधिकारी गोंदिया, अनिल पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद गोंदिया, विश्व पानसरे, पोलीस अधिक्षक, गोंदिया, जिल्यातील विविध विभागाचे अधिकारी/ पदाधिकारी व इतर मान्यवर यांच्या प्रमुख उपस्थितीत सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय गोंदिया द्वारे विभागाच्या योजनांचा प्रचार–प्रसार करण्याकरीता तयार करण्यात आलेल्या स्टॉल चे उद्घाटन करण्यात आले.

सदर स्टॉलमध्ये सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यात येणा?्या योजना, विभागांतर्गत विविध महामंडळा मार्फत राबविण्यात येणा?्या योजनांची उपस्थित असलेल्या सर्वांना माहिती करुन देण्यात आली. समाज कल्याण विभागाचे सचिव सुमंत भांगे व समाज कल्याण विभागाचे आयुक्त डॉ.प्रशांत नारनवरे यांनीही कार्यक्रमात सहभाग घेतला व संपूर्ण राज्यात कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले. राज्यात प्रथमच अभिनव पद्धतीने शासनाच्या वतीने असा उपक्रम राबविण्यात आल्याने समाजातील सर्व स्तरातून विभागाचे अभिनंदन करण्यात येत आहे.

समाज कल्याण विभागाचे सर्व उपायुक्त, सहाय्यक आयुक्त, जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांच्यासह सह विभागाचे अधिकारी, कर्मचारी यांच्या बरोबरच बार्टीचे अधिकारी–कर्मचारी, तालुका समन्वयक, समता दूत, स्वयंसहायता युवा गटाचे प्रतिनिधी हे गावागावात पोहोचले होते त्यांनी योजनांची माहिती जनतेला करून दिली.

# महेंद्र निंबार्ते यांची भाजपा ओबीसी मोर्च्याच्या जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती

**भंडारा:** भंडारा जिल्ह्यातील विद्यार्थी व युवक चळवळीचे नेते महेंद्र निंबार्ते यांची भारतीय जनता ओबीसी मोर्च्याच्या जिल्हा अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. भाजपा जिल्हाध्यक्ष शिवरामजी गिऱ्हेपुंजे यांनी नियुक्ती केली केली आहे. सदर नियुक्ती ओबीसी मोर्च्याचे प्रदेश अध्यक्ष योगेश टिळेकर, पूर्व विदर्भ संघटनमंत्री उपेन्द्र कोठेकर, प्रदेश महामंत्री संजय गाते, पूर्व विदर्भ संपर्क प्रमुख रवी चौहान, प्रदेश उपाध्यक्ष राजेश बांते यांच्या सूचनेनुसार करण्यात आली.

महेंद्र निंबार्ते विद्यार्थी दशपासून अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे कार्यकर्ते होते. त्यांनी पूर्णवेळ विद्यार्थी परिषदेचे कार्य केले, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, यवतमाळ, वाशीम या जिल्ह्यामध्ये विविध जबाबदाऱ्या पार पाडल्या, विभागीय संघटनमंत्री म्हणून त्यांनी काम केले. राष्ट्रीय कार्यकारिणीत सुद्धा होते. भारतीय जनता पक्षाचे जिल्हामंत्री, भारतीय जनता युवा मोर्च्याचे भंडारा जिल्हाध्यक्ष म्हणून काम केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे दहा वर्षे सिनेट सदस्य होते. विद्यापीठाचे पाच वर्ष व्यवस्थापन परिषद सदस्य सुद्धा होते. भंडारा नगर परिषदेचे नगरसेवक म्हणून निवडून आले होते. सध्या त्यांच्याकडे जिल्हा उपाध्यक्ष म्हणून जबाबदारी आहे. त्यांचे अभिनंदन प्रदेश महामंत्री चंद्रशेखर बावनकुळे, भंडारा गोंदिया लोकसभेचे खासदार सुनिलजी मेंढे, भंडारा गोंदिया विधान परिषदेचे आमदार डॉ परिणय फुके, माजी खासदार शिशुपाल पटले, प्रशांत खोब्रागडे, रेखाताई भाजीपाले, गोपाल रेहपाडे, अंबादास डोंगरवार, मंगेश ढोमने आदींनी केले.



# कोविडमुळे पती गमावलेल्या महिलांच्या पाठिशी भावासारखे उभे रहा-अपर जिल्हाधिकारी खवले

**गोंदिया :** घरातील कर्ता माणूस कोविडमुळे गेला हे दुःख त्या महिलेसाठी डोंगराएव्हढे आहे. अधिकारी म्हणून आपण अशा प्रकरणांमध्ये संवेदनशील होऊन काम करणे आवश्यक आहे. शासनाच्या विविध विभागाच्या योजना या विधवा भगिनींना प्राधान्याने मिळायला हव्यात. कोविड प्रकोपामुळे विधवा झालेली महिला ही आपली बहिणच आहे या भावनेने त्यांच्या पाठीशी उभे राहून आपल्यातील संवेदनशीलतेचा परिचय करून द्या, असे आवाहन अपर जिल्हाधिकारी राजेश खवले यांनी सर्व यंत्रणांना केले.



जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित ममिशन वात्सल्यफ योजनेच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हा बाल संरक्षण अधिकारी गजानन गोबाडे यांचेसह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

मागील दोन वर्ष सर्व जगाने 'कोरोना' या संसर्गजन्य आजाराशी लढा दिला. या लढ्यात अनेकांनी आपले स्वकीय व आप्त गमावले. गोंदिया जिल्ह्यातील ३०४ महिलांनी आपले पती या महामारीत गमावले. अशा एकल किंवा विधवा झालेल्या महिलांसाठी शासन आपल्या दारी या संकल्पनेनुसार मिशन वात्सल्य योजना शासनाने सुरु केली आहे. या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी अपर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात आली होती.

शासनाच्या वैयक्तिक लाभाच्या योजना विविध विभागामार्फत राबविल्या जातात. अशा योजनांचा लाभ या महिलांना प्राधान्याने देण्यात यावा अशा सूचना त्यांनी यावेळी केल्या. श्री. खवले पुढे म्हणाले की, अशा प्रकारच्या घटनेत अधिकाऱ्यांनी अधिक संवेदनशील होवून काम करणे आवश्यक आहे. अशा दुःखाच्या प्रसंगी शासन व प्रशासन आपल्या सोबत आहे ही खात्री व विश्वास द्या.

आदिवासी विकास विभाग, कृषी विभाग, महसूल विभाग, पशुसंवर्धन व मत्स्यव्यवसाय विभागाच्या योजनांचा लाभ या माता भगिनींना देण्यात यावा. ज्या महिलांवर असा दुःखाचा डोंगर कोसळला आहे त्या महिला आपल्या पर्यंत पोहोचू शकणार नाहीत अशावेळी आपण स्वतः त्यांच्यापर्यंत पोहोचून त्यांची मदत करणे हाच ममिशन वात्सल्यफ योजनेचा खरा उद्देश आहे. या योजनेत काय प्रगती झाली याचा दर गुरुवारी आढावा घेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. प्रत्येक विभागाने लाभ दिलेल्या लाभार्थ्यांची तालुकानिहाय यादी प्रत्येक गुरुवारी सादर करावी असे निर्देश दिले.

यातील अनेक महिलांना कौशल्य विकास प्रशिक्षण देऊन आत्मनिर्भर करण्यात यावे. सकारात्मक होऊन ही काम केली जावीत. केवळ ऑनलाईन अर्ज भरला नाही म्हणून या महिलांना लाभापासून वंचित न ठेवता प्रसंगी ऑनलाईन अर्ज करण्यासाठी आपल्या यंत्रणेने त्यांना मदत करणे अपेक्षित असल्याचे त्यांनी सांगितले. ही विधवा महिला आपली बहीण आहे असे समजून त्यांना मदत करण्यात यावी. त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी काही मदत अथवा सहकार्य लागल्यास ते स्वयंस्फूर्तीने करावे, त्यांच्या मदतीसाठी मोठा भाऊ म्हणून धावून जा असा सल्ला त्यांनी अधिकाऱ्यांना दिला. मिशन वात्सल्य या योजनेत एकही महिला वंचित राहता काम नये, असे ते म्हणाले. पुढील बैठकीत लाभार्थी व योजना निहाय आढावा घेण्यात येईल असे त्यांनी सांगितले.

# जिल्ह्यातील मालगुजारी तलावांची दुरुस्तीअभावी दुरावस्था

**खेमेंद्र कटरे**

**गोंदिया:–** तलावांची संख्या मोठी असल्याने जिल्ह्याची ओळख तलावांचा जिल्हा म्हणून आहे. जिल्ह्यातील तलावांची देखभाल व्हावी व सिंचनाचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी पाटबंधारे विभागाकडून वारंवार निधीची मागणी करण्यात येते.ते मात्र याकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याने आजघडीला बहुतांश तलावांची स्थिती दयनीय होत चालली आहे.



गोंदिया शहरानजीकच्याच फुलचूर येथील तलावाला बुजवून शासकीय तंत्रनिकेतन व नंगपूरा मुरी येथील तलाव बुजवून मागासवर्गीय आश्रमशाळेचे बांधकाम करण्यात आलेले आहे. हे दोन तलाव बुजेपर्यंत लघुपाटबंधारे विभागाने लक्ष दिले नव्हते. शेवटी तलावात गाळ आणि केरकचरा साठल्यानंतर मात्र तलाव कामाचे नाही असा शेरा देऊन ती जागा बांधकामासाठी देण्यात आली. तीच परिस्थिती गोंदिया शहरातील छोटा गोंदिया परिसरात जुना तलाव आजही आहे, जो जिल्हा परिषदेच्या मालकीचा आहे. त्या तलावाच्या आजूबाजूला लोकांनी अतिक्रमण करुन पक्के घरांचे बांधकाम केल्याने या तलावाचे क्षेत्रफळही लहान झाले आहे.

आजघडीला जिल्ह्यात ८ मध्यम प्रकल्प, २२ लघु प्रकल्प, १४२१ माजी मालगुजारी तलाव, १९२ लघु सिंचन तलाव, २६ पाझर तलाव, २९४ कोल्हापुरी बंधारे, १५५९ संग्रहित बंधारे व ४१ सिमेंट नाले आहेत. १,६०२ मालगुजारी तलाव भंडारा जिल्ह्यात आहेत.

पूर्वी अशा तलावांची मालकी परिसरातील मालगुजारांकडे होती. मात्र, १९५० च्या संपत्ती हक्क कायद्यानुसार मामा तलाव शासनाच्या ताब्यात गेले. त्यामुळे तलावांचा सामान्य जनता व शेतकऱ्यांशी संबंध तुटला. शासनाने १९६३ मध्ये देखभाल व पाणीवाटप व्यवस्थापनासाठी नेमलेल्या बर्वे आयोगाच्या शिफारशीनुसार दुरुस्ती व पाणी वाटपावर पाणीकर आकारायचे ठरविले. याला त्यावेळी जनतेने विरोध केला. मात्र, शासनाने त्याची दखल घेतली नाही. तेव्हापासून या तलावांची दुरवस्था सुरू झाली. जिल्हा परिषदेला लघु पाटबंधारे विभागाकडे आलेले मालगुजारी तलाव रोहयोच्या कामापुरते मर्यादित राहिले. पावसाळ्यात भरलेला तलाव दोन महिन्यात रिकामा होतो. सिंचनाचे सोडा जनावरांना पिण्यासाठी पाणी मिळत नाही. एकेकाळी हजारो एकर शेती सिंचित करण्याची क्षमता असलेले मालगुजारी तलाव शासन व संबंधित विभागाच्या दुर्लक्षामुळे निरूपयोगी ठरले. दुरुस्तीच्या नावावर खर्च होणारा निधी हा कुणाच्या खिशात जातो हे या तलावांच्या अवस्थेवरुन नक्की बघायला मिळते.

कालव्यांची अपूर्ण कामे, वाढते अतिक्रमण, गाळाचा उपसा न होणे यामुळे तलाव बिनकामाचे ठरले. बहुतांश नागरिकांचा मुख्य व्यवसाय शेतीच असल्याने तलावांच्या उद्धारावरच येथील अर्थकारण अवलंबून असल्याने हा प्रश्न प्राधान्याने सोडविणे गरजेचे आहे. सिंचनक्षमता कमी झाल्याने मामा तलाव दोन महिन्यात रिकामे होतात. शासनाने तलाव ताब्यात घेतले; मात्र देखभाल दुरुस्तीकडे दुर्लक्ष केले. खोलीकरण केले तरच तलावांचे आणि परिसरातील नागरिकांचे भाग्य उजळू शकते. अन्यथा मामा तलाव नकाशावर राहतील, यात शंका नाही. तलावांच्या खोलीकरणासोबतच तलावातून शेतकऱ्यांच्या शेतीपर्यंत जाणारे नहर बनणे गरजेचे आहे. नहरापासून प्रत्येक बांधापर्यंत जाणाऱ्या कॅनलचे बांधकाम झालेले नसल्याने पाणी जमिनीत मुरते. त्यामुळे पाण्याचा अपव्यय होतो. शासनाच्या सर्व विभागांनी नियोजनबद्धरीत्या काम केले तरच शेतकऱ्यांना वर्षभर पाणी मिळेल.

विशेष म्हणजे पूर्व विदर्भातील जलसंकट दूर करण्यासाठी मालगुजारी तलावांचे पुनरुज्जीवन करण्याचा महत्वकांक्षी निर्णय तत्कालीन युतीच्या सरकारने घेतला होता. तलावांच्या पुनरुज्जीवनासाठी नवा प्लान आखण्यात आला होता. त्यात मालगुजारी तलावाचे पुनरुज्जीवण करुन पूर्व विदर्भात सिंचनाच्या सुविधा निर्माण करण्याचे धोरण राज्य शासनाने राबविले होते. त्यासाठी तत्कालीन अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवर यांनी २०१५–१६ या आर्थिक वर्षासाठी १०० कोटी रुपये खर्च करण्याची तरतूदही केली होती. पूर्व विदर्भातील नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात माजी मालगुजारी तलावांची संख्या ६ हजार ७३४ आहे. या तलावांचे पुनरुज्जीवण करुन जलसंकट दूर करण्याची योजना होती.या कामाला गती देण्यासाठी आता खास तीन वर्षांचे २०१६–१७, २०१७–१८, २०१८–१९ या आर्थिक वर्षांत पुनरुज्जीवणाचे काम करण्यात येणार होते. परंतु विशेष काही झाल्याचे दिसून येत नाही.

त्यातच गोंदिया जिल्हा परिषदेच्या लघु सिंचन प्रकल्पातंर्गतर्ग ३ हजार ५५९ लघु सिंचन तलाव आहेत. त्यातील ३२४ तलाव व बंधारे नादुरुस्त आहेत. दुरुस्ती करण्याची नितांत गरज आहे. दुरुस्ती कामाकरिता शासनाकडे ५६ कोटी ८३ लाख रुपयांचा प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यानंतरच तलाव व बंधाऱ्यांची दुरुस्ती करण्यात येईल, असे कार्यकारी अभियंता एस.एन.राऊत यांनी सांगितले.

# "महाज्योती"च्या योजनांची प्रभावी अमंलबजावणी करा-मंत्री वडेट्टीवार

**नागपूर :** इतर मागासवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती व विशेष मागासप्रवर्ग या प्रवर्गातील व्यक्तींच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक विकासासाठी विविध योजना, उपक्रमांची "महाज्योती" मार्फत प्रभावी अंमलबजावणी करा, असे निर्देश इतर मागास बहुजन कल्याण मंत्री विजय वडेट्टीवार यांनी येथे दिले.



सामाजिक न्याय भवन येथे महाज्योतीच्या संचालक मंडळाची बैठक श्री. वडेट्टीवार यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. महाज्योतीच्या कामकाजाचा सविस्तर आढावा यावेळी घेण्यात आला. महाज्योतीचे सदस्य लक्ष्मण वडले, दिवाकर गमे, बबनराव तायवाडे, व्यवस्थापकीय संचालक प्रदीपकुमार डांगे, समाजकल्याण उपायुक्त सिद्धार्थ गायकवाड, मुख्य लेखा वित्त अधिकारी अतुलकुमार वासनिक, कंपनी सेक्रेटरी अविनाश गंदेवार, प्रकल्प अधिकारी कुणाल सिरसाठे आदी यावेळी उपस्थित होते.

समाजातील इतर मागासवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागासप्रवर्ग या कमकुवत घटकांच्या सर्वसमावेशक सर्वांगिण शाश्वत विकासासाठी "महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था" (महाज्योती) या स्वायत्त संस्थेची स्थापना करण्यात आली असून संस्थेमार्फत मागासवर्गियांसाठी सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक विकास, संशोधन, रोजगारभिमुख वृध्दी, कौशल्यविकास, स्वयंरोजगार, ग्रामीण विकास, शेती विकास, व्यक्तिमत्व विकास , स्पर्धात्मकता विकास, सामाजिक ऐक्य व सलोखा आणि तत्सम क्षेत्रांमध्ये विविध उपक्रम राबवावे, असे श्री. वडेट्टीवार यांनी सांगितले.

इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील जातींचा इतिहास, संस्कृती, चालीरीती, रुढी–परंपरा, पारंपारिक व्यवसाय आदींची माहिती तसेच समग्र वाङमयाची निर्मिती महाज्योतीतर्फे करण्यात येणार आहे. त्यामध्ये पाच खंडांचा समावेश असून या खंडांची छपाई शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार येथून करण्यात येईल, यादृष्टीने काटेकोर नियोजन करावे, असे आदेश महाज्योती प्रशासनास त्यांनी दिले.

महाज्योतीतर्फे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी विविध योजना व उपक्रम राबविण्यात येतात. त्यानुषंगाने इतर मागासवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती व विशेष मागासप्रवर्ग या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना युपीएससी, एमपीएसी स्पर्धा परीक्षेसंदर्भात दिल्ली येथील नामांकीत संस्थेत प्रशिक्षण व पंधराशे रुपये प्रतीमाह छात्रवृत्ती (स्टायपेंड) दिल्या जाते. डॉक्टरेट (पीएचडी) करणाऱ्या विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती योजना राबविण्यात येत आहे. जेईई, नीट व एमएचसीइटी परीक्षेच्या विद्यार्थ्यांना टॅब पुरवठा केला जाणार असून प्रशिक्षण सुविधाही त्यांना पुरविल्या जाणार आहेत. केंद्रीय लोकसेवा आयोग नागरीसेवा व्यक्तिमत्व चाचणी परीक्षेसाठी आर्थिक सहाय्य संस्थेव्दारे देण्यात येणार आहे. संस्थेव्दारे वैमानिक प्रशिक्षणाकरिता वीस विद्यार्थ्यांची निवड केल्याची माहिती श्री. वडेट्टीवार यांनी दिली.

शेतकऱ्यांसाठी करडई तेलबिया उत्पादन प्रकल्पांतर्गत अर्थसहाय्य योजनेतून विदर्भातील सात जिल्ह्यातील शेतकऱ्यांना लागवडीसाठी खते, किटकनाशक व पिक संवर्धक औषधीसाठी २ हजार २०० रुपये अनुदान दिल्या जाईल. याचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवनचरित्रावर आधारित "तृतीय गुणरत्न" या उत्कृष्ट नाटकाच्या प्रयोग सादरीकरणासाठी निर्मात्यांना व त्यांच्या चमूला अनुदान दिल्या जाईल. येत्या काळात मुंबई, रत्नागिरी व नांदेडे येथेही महाज्योतीचे कार्यालय स्थापन करण्यात येणार असून त्यामार्फत तेथील क्षेत्रातील मागासवर्गीयांना विविध योजनांचा लाभ दिला जाईल, असेही श्री. वडेट्टीवार यांनी यावेळी सांगितले.